शनिवार, २ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ११३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 2 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-113 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05



छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील धान्य वितरण कार्यालयासमोर अवकाळी पावसाचे पाणी साचले आहे. त्यामुळे या परिसराला तलावाचे स्वरूप आले आहे. छायाचित्र : अतिश गवळे

## पुणे - बंगळुरु महामार्ग रोखला

आधुनिक केसरी न्यूज

सुशील गायकवाड

**खंडाळा : लोणंद येथील नगरपंचायत पटांगणावर धनगर समाजाच्या एसटी आरक्षण शिफारशीकरिता गेल्या पंधरा दिवसांपासून गणेश केसकर आमरण उपोषणाला बसले आहेत. या आंदोलनाची दखल शासन स्तरावर घेत नसल्याने धनगर समाजाने एल्गार पुकारत शुक्रवारी खंडाळा तालुका बंद व नंतर महामार्ग बंदची हाक देत पुणे - बंगळूरू महामार्ग रोखण्यात आला. पुणे आणि सातारा बाजूकडे लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या व वाहतूक ठप्प झाली.**

धनगर आरक्षणासाठी समाजाच्यावतीने महामार्ग रोखण्याचा इशारा देण्यात आला होता. त्याप्रमाणे शुक्रवारी खंडाळा येथे रास्ता रोको करण्यात आला. धनगर समाजाला एसटीचे आरक्षण द्यावे या मागणीसाठी हजारो धनगर बांधव, महिला, युवक, युवती या रास्ता रोकोमध्ये सहभागी झाल्या आहेत. 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या घोषणाही या वेळी देण्यात येत आहेत. महामार्ग बंद झाल्याने वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. आरक्षणाच्या मागणीला सध्या मोठा प्रतिसाद मिळत आहे. यासाठी चार दिवसांपूर्वी आयोजित खंडाळा तालुका बंदला मोठा प्रतिसाद मिळाला होता. खंडाळा तालुक्यातील बहुतांश गावातील दुकाने बंद ठेवण्यात आली होती. शासन दखल घेत नसल्याने समाजाच्या बांधवांनी नीरा नदीत जलसमाधी घेण्याचा प्रयत्न केला होता. आरक्षणासाठी गणेश केसकर यांच्या उपोषणाच्या तेराव्या दिवशी शासनाचा तेरावा घालण्यात आला. यानंतरही शासन लक्ष देत नसल्याने आज पुणे-बंगळूरू महामार्ग बंद करण्यात आला. केसरकर यांनी उपोषण मागे घ्यावे यासाठी शासकीय व राजकीय प्रयत्न करण्यात आले होते. पालकमंत्री शंभूराज देसाई व आमदार मकरंद पाटील यांनी त्यांची भेट घेतली होती. आजच्या रास्ता रोकोत महिला, युवक, युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महामार्गावर बकऱ्या सोडून महामार्ग अडविण्यात आला आहे. महामार्ग बंद करण्यात आल्याने सातारा, कोल्हापूर, सांगली, बंगळूरू व पुणे-मुंबईकडे जाणारा रस्ता बंद झाल्याने प्रवाशांची मोठी अडचण झाली. अनेकांनी भोर-मांढरदेव-वाई मार्गे साताऱ्याकडे जाण्यासाठी मार्ग अवलंबला. महामार्ग रोखण्यात येणार असल्याने मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



## राजू शेट्टींनी ठोकला जयंत पाटलांच्या कारखान्यासमोर तंबू

आधुनिक केसरी न्यूज



**सांगली :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी आपला मोर्चा सांगलीमधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडे वळवला आहे. राजू शेट्टी यांनी जयंत पाटील यांच्या कारखान्यासमोर तंबू ठोकला आहे. सांगली जिल्ह्यातील ऊस दरासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. इस्लामपुरातील साखराळे येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मालकीच्या राजारामबापू साखर कारखान्यामध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी घुसत उसाच्या गाळपसाठी असणाऱ्या गव्हाणीत थेट उड्या मारल्या. या ठिकाणी साखर कारखान्याचा आतील ऊस काटा बंद पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला. पोलिसांकडून या ठिकाणी स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, पोलिसांचा दबाव झुगारून स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी कारखान्याच्या आत घुसून उसाचा गाळप बंद पाडण्यासाठी उसाच्या गव्हाणीत थेट उड्या देखील मारल्या. राजू शेट्टी कार्यकर्त्यांसोबत काटाबंद आंदोलन ठिकाणी दाखल झाले आहेत. दरम्यान, ऊस दरावर तोडगा काढण्यासाठी राजारामबापू साखर कारखाना प्रशासनासोबत स्वाभिमानीची बैठक फिस्कटली आहे. राजारामबापू साखर कारखान्याकडून 3100 रुपये पहिली उचल आणि गत हंगामातील 50 रुपये देण्याचा प्रस्ताव देण्यात आला. मात्र, रिकव्हरी रेटप्रमाणे पहिली उचल 3200 रुपये देण्याच्या मागणीवर राजू शेट्टी यांनी ठाम भूमिका घेतली आहे. दुसरीकडे राजू शेट्टी यांनी जयंत पाटलांवर कडाडून हल्ला चढवला आहे. त्यांनी फेसबुकवर पोस्ट करत म्हटले आहे की, विरोधी पक्ष म्हणजे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारा पक्ष झाला आहे. आपले ठेवायचे झाकून आणि दुसऱ्याचे बघायच वाकून ही भूमिका जयंत पाटील यांनी घेतली आहे. त्यांच्याच कारखान्यावर शेतकरी घामाच्या दामासाठी चिखलात बसला आहे. ज्यांनी एफआरपीचे दोन तुकडे करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ताटात माती कालविण्याचे पाप केले. त्यावेळी तुम्ही त्यांना पाठिंबा देत तोंड बंद करून बसलात. आज कारखाना सुरू होवून जवळपास एक महिना झाला तरीही शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे न देण्यासाठी सत्ताधारी व विरोधी कारखानदारांना एकत्रित करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नागवे करण्यात येत आहे. यामुळे ज्यांना स्वतःच्या मतदारसंघातील शेतकऱ्यांचा आक्रोश ऐकू येत नसेल त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांना न्याय हक्काची लढाई शिकवू नये. राजू शेट्टी म्हणाले की, सरकारच्या डोक्यात राजकारण आहे. जाहिरातबाजी करणे या पलीकडे काहीच करत नाही.

## शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** लोहा-कंधार मतदारसंघात दिनांक 27,28 नोव्हें रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे मतदारसंघातील शेतकरी बांधवांचे तूर, हरभरा, कापूस, गहू, केळी ,ऊस, हळद सह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याने शेतकरी बांधव प्रचंड आर्थिक अडचणीत आला असल्यामुळे प्रशासनाने अवकाळी पाऊस व गारपिटीच्या तडाख्यात मतदारसंघातील नूकसानग्रस्त शेती पिकांचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याची सूचना लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय ,कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी लोहा,कंधार तहसीलदारांना दिले आहेत.अवेळी पाऊस, गारपीट व अवकाळी पावसामुळे या अगोदरही मतदारसंघातील शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडला असून मी मतदारसंघातील शेतकरी बांधवांच्या सदैव पाठीशी खंबीरपणे उभा असून शेतकरी बांधवांनी कदापि खचून जाता कामा नये, लोहा-कंधार मतदारसंघातील नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस व गारपोटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर भरीव आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी बोलताना सांगितले.

## अवकाळीनंतर आता ढगाळ वातावरण; रबी हंगामातील पिके धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

वसंत पाटील

वाशिम : खरीप हंगामात अल्पवृष्टीमुळे पिकांचे खूप मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे खरीप हंगामातील उत्पादनात कमालीची घट झाली आहे. मात्र, निराश झालेले शेतकरी खरिपातील कसर रब्बी हंगामात भरून निघेल या अपेक्षेणे पुन्हा कंबर कसून जोमाने कामाला लागले होते. आणि त्या अनुषंगाने निसर्गाने सुद्धा थोड्याफार प्रमाणात पाहिजे तशी साथ दिली असल्यामुळे, आजतागायत रब्बी हंगामातील तूर, हरभरा, गहू, कापूस आदी पिकांनी बहार धरला होता. पण अचानक निसर्गाने शेतकऱ्यांची साथ सोडली. अन.. पाहता, पाहता एकाएकी वातावरणात बदल झाला. गेल्या दोन दिवसाआधी बेमोसमी अवकाळी पाऊस धो, धो बरसला. त्यानंतर आता पुन्हा ढगाळ वातावरण निर्माण झाले असून, सकाळी दाट धुके सुद्धा पडत आहे. परिणामी आळयांचा आणि मर रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. हीच स्थिती आणखी काही दिवस राहिल्यास संपूर्ण रब्बी हंगाम धोक्यात येण्याची भीती तज्ञांकडून वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे खरीप हंगामापासून शेतकऱ्यांच्या पाठीमागे लागलेली साडेसाती अद्यापही सुरूच असल्याचे स्पष्ट दिसत आहे. सातत्याने होत असलेल्या वातावरणातील बदलामुळे उत्पादनात घट होण्याचा धोका तर आहेच, त्याचबरोबर शेतकऱ्यांची मेहनत आणि कष्टही निष्फळ ठरण्याची चिन्ह दिसत आहेत. कारण तालुक्यात येत असलेल्या करडा या गावातील शेतकरी अरविंद केशवराव देशमुख यांनी खरीपातील उत्पादनाची घट रब्बीत भरून काढण्यासाठी मोठ्या मेहनतीने व कष्टाने आपल्या शेतातील तूर व हरभरा पिकांना सिंचनाद्वारे पाणी दिले होते. मात्र अचानक पडलेल्या अवकाळी पावसाने त्यांचे गणित चुकवले आहे. पहिलेच भरपूर प्रमाणात पाणी दिले, आणि त्यातच बेमोसमी पाऊस पडला. त्यामुळे संपूर्ण शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. जेमतेम अवकाळीने थोडी उसंत घेतली तर, लगेचच पुन्हा ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच दररोज सकाळी दाट धुके सुद्धा पडत




आहे. त्याचा विपरीत दुष्परिणाम देशमुख यांच्या तूर व हरभरा पिकावर मोठ्या प्रमाणात झाला असल्याची माहिती शेतकरी देशमुख यांनी दिली आहे. त्यांच्या माहितीप्रमाणे शेतातील तुरीचे उभे पीक वाळून चालले असून, शेंगा पक्व होण्याआधीच संपूर्णतः करपून गेल्या आहेत. तर हरभरा पिकावर मर रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे आजमितिस त्यांच्या शेतातील हरभऱ्याचे पीक वीस ते पंचवीस टक्के प्रमाणात मरगळून उध्वस्त झाले आहे. याबाबत त्यांनी जवळच्या कृषी विज्ञान केंद्रातील तज्ञांचे मार्गदर्शन घेतले असता, रब्बी हंगामात पाण्यापेक्षा थंडी पडणे खूप गरजेचे असते. परंतु ढगाळ वातावरणामुळे थंडीचे अत्यल्प प्रमाण आहे. शिवाय बहुतांश शेतकरी हे उत्पादन वाढीसाठी व अळयांच्या बंदोबस्तासाठी बाजारातील विविध शेतीसाठी घातक असलेले कीटकनाशके व रासायनिक खतांचा जास्त प्रमाणात वापर करत असल्याने अशा शेतात बुरशीचे प्रमाण वाढत आहे. त्या कारणाने सुद्धा मर रोगाचा प्रादुर्भाव वाढून अशा समस्या उद्भवत असल्याची माहिती तज्ञांकडून मिळाली असल्याचे शेतकरी अरविंद देशमुख यांनी सांगितले आहे. त्या अनुषंगाने आणखी काही दिवस सद्यस्थितीत असलेले ढगाळ वातावरण असेच कायम राहिल्यास रब्बी हंगामातील पिके धोक्यात असल्याचे स्पष्ट होत आहे.

**पंचनाम्यासाठी प्रशासना सोबतच लोकप्रतिनिधीही उदासीन** :अवकाळी पावसाने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे सर्वश्रुत आहे . त्यानुकसानीचे पंचनामे करून शासनाकडून आर्थिक मदत मिळावी अशी ओरड सुद्धा शेतकरी करीत आहेत . मात्र संबंधित प्रशासन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून तक्रार दाखल झाली तरच त्या ठिकाणाचा पंचनामा करत आहेत . सरसकट पंचनामे करण्याचे सत्र अद्यापतरी सुरू झाले नाही . आणि या गंभीर प्रकाराबाबत विविध क्षेत्रातील लोकप्रतिनिधी मूग गिळून गप्प आहेत .



अवकाळी पाऊस व ढगाळ वातावरणामुळे उद्भवलेल्या दूषित वातावरणात तुरीमध्ये फुलगळ आणि बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव संभवतो . यासाठी शेतकऱ्यांनी सायंकाळी शेतात धूर करावा व तुरीमध्ये शिफारशीत केलेल्या बुरशीनाशकांची फवारणी करावी . जमिनीत विविध रोग निर्माण करणाऱ्या बुरशीच्या बंदोबस्तासाठी प्रतिबंधित ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक ड्रीचिंग द्वारे जमिनीत सोडल्यास उपरोक्त समस्यांना अटकाव घातल्या जाऊ शकतो . **राजेश डवरे, कीटक शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र वाशिम . तथा तांत्रीक समन्वयक कृषि महाविद्यालय रिसोड**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

## 'मूर्ती' घडवणारा शिल्पकार

एवढी मोठी व्यक्ती आपल्याबरोबर थांबल्याने सुधा मूर्तींना भरून आले. पुढे नारायण मूर्ती आल्यावर जे आर डींनी त्यांना ' वेळेवर येत जा, आपल्या पत्नीला वाट पाहायला लावू नका ' असा सल्ला दिला. पुढे नारायण मूर्तींनी स्वतःची कंपनी सुरु करायची ठरवल्यानंतर सुधा मूर्तींनी टेल्को सोडण्याचे ठरवले. तेव्हा त्या जे आर डींना भेटल्या. त्यांना म्हणाल्या, ' माझे पती नवीन कंपनी सुरु करीत आहेत. ती कितपत चालेल हे माहित नाही. पण त्यासाठी मला मात्र ही नोकरी सोडावी लागत आहे. ' त्यावेळी जे आर डींनी त्यांना फार सुंदर उत्तर दिले. त्या उत्तराचे आपणही सर्वांनी मनन करावे असे ते आहे. ते म्हणाले, ' सुरुवातीलाच अशी नकारात्मक भाषा बोलू नका. तुमचे पती नवीन कंपनी सुरु करीत आहेत, तर तुम्हाला तिच्या यशाबद्दल खात्री असली पाहिजे. तुम्हीच जर साशंक असलात तर, पुढची वाटचाल कशी होईल ? दुसरी गोष्ट म्हणजे कंपनी नफ्यात आल्यानंतर आपल्या यशात समाजाचाही वाटा असतो हे विसरू नका आणि जे आपल्याला समाजाकडून मिळाले त्याची परतफेड कशी करता येईल, याचाही विचार करा. सुधा मूर्तीना जे आर डींचे हे शब्द कुठेतरी खोल मनामध्ये स्पर्श करून गेले. त्यांनी आपल्या इन्फोसिसच्या कार्यालयात दोन प्रतिमा लावल्या. एक जमशेटजी टाटांची आणि दुसरी हसऱ्या निळ्या डोळ्यांच्या जे आर डींची. जे आर डींचे वागणे, बोलणे त्यांच्यासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरले. पुढे सुधा मूर्तींनी जे आर डींना आवडणाऱ्या ग्रामीण भागातील महिलांच्या विकासासाठी आणि इतरही अनेक क्षेत्रात खूप मोलाचे काम केले. अशा रीतीने जे आर डीं प्रमाणे त्यांनीही समाजाला त्याचा वाटा परत देण्याचा प्रयत्न केला. जे आर डींमुळे सुधा कुलकर्णींना पुण्यात नोकरी मिळाली. पतीची भेटही पुण्यातच झाली. त्यांच्या कंपनीची वाटचाल जे आर डींच्या सल्ल्याप्रमाणे झाली. अशा रीतीने सुधा कुलकर्णींची ( सुधा )मूर्ती घडवण्यात जे आर डींचा मोठा वाटा आहे. पुढे त्यांच्या सहवासात मिनू मसानी आले आणि त्यांचे कायमचे मित्र बनून गेले. मिनू मसानी हे अत्यंत कुशाग्र बुद्धी लाभलेले विद्वान आणि विचारवंत. त्यांना जे आर डींनी टाटामध्ये निमंत्रित केले. पुढे काही कारणाने मसानींना




राजकारणात जावे लागले, तेव्हा जे आर डींनी त्यांना काम करताना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून टाटामधील पदाचा राजीनामा देण्यास सांगितले. पण पुढे त्यांच्या भवितव्याचा विचार करून त्यांना टाटामध्ये सल्लागार पदावर नेमले. त्यांच्या चरितार्थाची सोय केली. जे आर डीं आणि टाटांवर क्रिएशन ऑफ वेल्थ, बियाँड द लास्ट ब्लु माऊंटन, कीनोट, टच ऑफ ग्रेटनेस यासारखी अनेक लोकप्रिय पुस्तके लिहिणारे आर एम लाला हे कॅन्सरने आजारी झाल्याचे जेव्हा जे आर डींना कळले.



# आनंदी पहाट

## शारीरिक शिक्षणातील खेळांचे महत्त्व

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शारीरिक क्रियाकलाप आणि तंदुरुस्ती मुलांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे आपण सर्वजण जाणतो. तरुण विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी विश्रांती घेऊन बाहेर जाऊन खेळ खेळण्याचा आणि त्यांची काही अतिरिक्त ऊर्जा काढून टाकण्याचा खूप फायदा होऊ शकतो. शाळेतील खेळांमध्ये नियमितपणे भाग घेणे आणि इतर शारीरिक क्रियाकलाप मुलांना शारीरिक, मानसिक आणि सामाजिक

दृष्ट्या अनेक प्रकारे मदत करतात, असे दिसून आले आहे. ह्या सर्व गोष्टी बालपण आणि प्रौढत्व एकमेकांना अधिक परिपूर्ण आणि समाधानकारकरित्या जोडतात. पालक आपल्या मुलांना स्पोर्ट्स क्लबमध्ये प्रवेश देण्याच्या तयार नाहीत; आपला वेळ आणि शक्ती इतर क्रियाकलापांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे खर्च होईल या चिंतेने त्यांचा संभ्रम वाढतो. शाळेत खेळांमध्ये भाग घेणाऱ्या मुलांचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान त्यांच्या समवयस्कांच्या तुलनेत जास्त असतो. एखाद्या संघातील सहकाऱ्याने त्यांच्या पाठीवर थाप मारणे, आनंदाने टाळ्या वाजवणे मुलांच्या आत्मसन्मानासाठी आश्चर्यकारक परंतू अत्यंत उपयुक्त ठरू शकते. प्रशिक्षक, पालक आणि सहकाऱ्यांकडून मिळणारे प्रोत्साहन, प्रशंसा खेळाडूच्या आत्म-मूल्याच्या भावनेसाठी चमत्कार करतात. शाळेतील खेळ हा भावना व्यक्त करण्याचा उत्तम मार्ग आहे, मग तुम्ही केवळ प्रेक्षक असाल किंवा खेळामध्ये सक्रियपणे सहभागी असाल. तरुण खेळाडूंना त्यांच्या वाईट भावनांना तोंड कसे द्यायचे आणि त्यांची कामगिरी कशी सुधारायची हे शिकण्यासाठी भरपूर अनुभव आणि तंदुरुस्तीचे करिअर असलेल्या प्रशिक्षकाची मदत आवश्यक असू शकते. शाळेतील प्रत्येक खेळात मन, शरीर आणि डावपेच शिस्त आवश्यक असते. जेव्हा मुले खेळांमध्ये भाग घेतात, तेव्हा ते नियमांचे पालन करणे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे ऐकणे याद्वारे आत्म-नियंत्रण, संघकार्य आणि शिस्त यांचे मूल्य शिकतात. शिस्त हे सर्व यशस्वी लोकांचे वैशिष्ट्य आहे, कारण ते त्यांना त्यांची क्षमता वाढवण्यास आणि त्यांची उद्दिष्टे पूर्ण करण्यास मदत करते.




आधुनिक केसरी

## जाण मतितार्थ | जन्माचा ह्या ||

संसाराचे ओझे | मानू नये जड ||
सत्कर्माची जोड | असु द्यावी ||१||
उत्पन्नाचा मेळ | खर्चाशी घालावा ||
शिल्लक राखावा | मान जगी ||२||
गरजांची सिमा | ओळखली ज्याने ||
व्यवहार त्याने | सिध्द केला ||३||
सात्विक बुध्दीने | वागता जनात ||
तोच जगतात | सुखी होतो ||४||
हरिनाम जोडी | संसार परमार्थ ||
जाण मतितार्थ | जन्माचा ह्या ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी

द्वितीय संमंध जाला ।दुःख मागील विसरला ।
सुख मानून राहिला ।संसाराचें ॥१॥
जाला अत्यंत कृपण ।पोटें न खाय अन्न ।
रुक्याकारणें सांडी प्राण ।येकसरा ॥२॥
कदा कल्पांतीं न वेची ।सांचिलेंचि पुन्हा सांची ।
अंतरीं असेल कैंची ।सद्वासना ॥३॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

दुख असार संसार से, अवलम्बन सत्संग ।
तारक सरल उपाय है, शुभ मंगलमय
अंग ।।५६।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम
अध्याय) ०५/०५/५६
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
या असार संसार जगापासून तारणारा सत्संग आहे. या सरळ उपायाच्या अवलंबनाने जीवन निर्विघ्न आणि सर्वांगांनी सुखमय होते.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# गुणरूप

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

विशिष्ट लय, गेयता हीदेखील त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये होत. समर्थांची काव्यरचना आणि तिचे साहित्यगुण हा स्वतंत्र अभ्यासाचाच विषय आहे. परळी येथे मठस्थापना करताना मठाच्या परिसरात बाग करण्यात येत होती त्या वेळी त्यांनी बागेवरती एक अखंड प्रकरणच लिहिले. तसेच सामानगडावर किल्ले बांधताना लिहिलेल्या 'कारखाने' या प्रकरणाच्या पहिल्या समासात विटा कशा कराव्यात, बांधकाम या प्रकरणात मजुरांना कशी, किती कामे द्यावीत यासारखी सर्व माहिती त्यांनी दिली आहे. समर्थांना शतकोटी दंडवत दुसरे मार्गदर्शक तसेच गुरूवर्य श्री बेलसरे सरांचे बोट धरून मी इथं पर्यन्त आले आहे त्यांची प्रेरणा आशीर्वाद सतत मिळत आहे. सरांना माझे कोटी दंडवत मित्रांनो आज आपण नवव्या दशकांत समर्थ आपल्याला काय उपदेश देतात ते पहाणार आहोत.

# सगुणभक्ति

आधुनिक केसरी

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ' मला सोने भेटवा ' असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी 'कुणाचा' आहे हे जर जाणले तर मी ' कोण ' हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ' मी ', त्याला पाहायला जंगलात जायला नको. ' माझेपण ' सोडावे म्हणजे ' मी ' चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले. पोशाख निरनिराळे केले



तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास. सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वतः अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला ' सहजसमाधी ' असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ' राम सर्व करतो ' आणि ' राम माझा दाता आहे ' ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच. २७६. नाम घेताना स्वतःचा विसर पडणे ही सर्वोत्कृष्ट समाधी होय. नामात स्वतःला विसरण्यास शिकावे.

# समर्थ रामदास

विशिष्ट लय, गेयता हीदेखील त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये होत. समर्थांची काव्यरचना आणि तिचे साहित्यगुण हा स्वतंत्र अभ्यासाचाच विषय आहे. परळी येथे मठस्थापना करताना मठाच्या परिसरात बाग करण्यात येत होती त्या वेळी त्यांनी बागेवरती एक अखंड प्रकरणच लिहिले. तसेच सामानगडावर किल्ले बांधताना लिहिलेल्या 'कारखाने' या प्रकरणाच्या पहिल्या समासात विटा कशा कराव्यात, बांधकाम या प्रकरणात मजुरांना कशी, किती कामे द्यावीत यासारखी सर्व माहिती त्यांनी दिली आहे. आधीं सगळे दृष्य बाजूला सारायचे,मग अदृष्य शून्य ओलांडून पुढे जायचे. त्यानंतर मूळमायेचे पलीकडे असणाऱ्या परब्रम्हाचे दर्शन घडते. मित्रांनो मी या लेखाच्या सुरवातीला म्हणाले आहे की जन्माला आलो तेव्हा शून्य आणि मरतानाही शून्य. हेच शून्य आपण वेगळेपणाने पहातो. आपण वेगळेपणाने जोपर्यंत पहातो तोपर्यंत आपली वृत्ति शून्यत्वा पर्यन्त जाऊन तिथेच थांबते. त्यामुळे मनात शून्यपणाची भावना वाढते.





भारताने पर्यटन वाढीसाठी प्रयत्न करायला हवेत पान 6

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari






# ढोल वाजवत आदिवासी नृत्यावर मंत्री बावनकुळेंनी धरला ठेका

आधुनिक केसरी न्यूज

**संगमनेर :** आदिवासी समाजाची संस्कृती व कलेचे दर्शन असणारे आदिवासी कांबड नृत्यात सहभागी होण्याचा मोह भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना आवरला नाही. त्यातील ढोल वाजवत आदिवासी नृत्यावर ठेका धरला.

संगमनेर येथे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे घर अभियानाचे निम्मताने आले होते. या अभियानात भाजपा अनुसूचित जन जाती मोर्चाचे राष्ट्रीय मंत्री माजी आमदार वैभवराव पिचड यांनी आयोजन केले होते. नृत्याने संगमनेर करांचे लक्ष वेधून घेतले. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी या नृत्यात सामील झाले. यात ढोल वाजवण्याचा मोह आवरला नाही. या आदिवासी तरुणाकडून याविषयी माहिती जाणून घेतली. राष्ट्रीय पक्षाचा अध्यक्ष आदिवासी समाजाच्या नृत्यात सहभागी होऊन ठेका धरतो याचे सर्वांना आश्चर्य वाटले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे, शिर्डी लोकसभा संयोजक राजेंद्र गोंदकर, सचिन तांबे, वैभव लांडगे, श्रीराम गणपुले, सोनाली नाईकवाडी हेही सहभागी झाले.

22 जानेवारी 2024 मध्ये अयोध्या येथे श्रीराम प्रभू चे मूर्तीची प्राण प्रतिष्ठा कार्यक्रम होणार असून यासाठी अकोले तालुक्यातून किती नागरिकांना अयोध्या दर्शन घडविणार असे श्री. वैभवराव पिचड यांना समारोप सभेत विचारले असता 5000 पेक्षा जास्त राम भक्तांना अयोध्या नेणार असल्याचे भाजप माजी आमदार वैभवराव पिचड यांनी सांगितले. कोपरगाव, संगमनेर व अकोले तालुक्यातील सुपर वारियर्स यांच्या साठी मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. या सुपर वारियर्स च्या बैठकीसाठी माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या नेतृत्वाखाली सर्वात जास्त संख्येने सुपर वारियर्स व कार्यकर्ते उपस्थित होते. त्याचे ही कौतुक प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी केले. भाजपा सुपर वारीयरर्स च्या बैठकीत माजी आ. वैभवराव पिचड यांच्या नेतृत्वाखाली अकोले तालुक्याची छाप दिसून आली. त्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे, अकोले तालुकाध्यक्ष यशवंतराव आभाळे, भाऊसाहेब वाकचौरे, तालुका सरचिटणीस राहुल देशमूख, मच्छिन्द्र मंडलिक, सचिन जोशी, कार्यालयीन सचिव अशोक आवारी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# जखमी अजगराचा उपचार सुरू असताना मृत्यू

## वनविभाचे शर्तीचे प्रयत्न : वनरक्षक जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** बामळी फाटा (ता. धर्माबाद) परिसरात शूक्रवारी ता.(एक) दूपारी एकच्या सुमारास जखमी झालेल्या अजगरावर येथील वनविभागाने उपचाराचे शर्थीचे प्रयत्न केले पण दूर्देवाने त्याचा मृत्यू झाला. दरम्यान वनरक्षक किरकोळ जखमी झाला आहे.
#वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार,बाभळी बंधारा (ता.धर्माबाद) परीसरात दलदल असल्याने तिथे नेहमीच भक्षाच्या शोधत असलेले अजगर आढळून येतात.यापूर्वी तीनचार वेळा वनविभागाने अजगराला सूरक्षीत स्थळी सोडून दिले आहे.त्यापाठोपाट शूक्रवारी याच परिसरात रस्त्यावरील पूलाच्या खाली अजगर आसल्याची माहिती वनविभागाला मिळताच ऊमरी येथील वनरक्षक एम.एम.शेख यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन जखमी अजगरावर प्राथमिक ऊपचार करण्यासाठी भोकर वनविभागात आणले. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिक मोडवान,वनपाल ज्ञानेश्वर धोंडगे यांनी अजगरावर उपचार करण्यासाठी सर्पमित्र कृष्णा शिलेमाने,आकाश पांचाळ,दलीत डोंगरे,सुमेध घूले, अर्जुन ठाकुर यांना बोलावून शर्थीचे प्रयत्न केले पण दूर्देवाने त्याच्या डोक्यात जखमी दुखापत झाल्याने ऊपचारा दरम्यान आखेर त्याचा मृत्यू झाला.वनविभागाने मृत अजगरावर अंत्यसंस्कार केले आहेत.

**वनरक्षक जखमी** : बाभळी परिसरात जखमी झालेल्या आजगरास कीशोर पांचाळ यांच्या मदतीने वनरक्षक एम .एम .शेख दूचाकीवरून उपचारासाठी भोकरकडे येतांना श्री .शेख यांना अजगराने चावा घेतल्याने ते किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले असून त्याची प्रकती ठिक आहे अशी वनविभागाकडून माहिती मिळाली आहे .
वन्य प्राणी पाणी व भक्याच्या शोधात मानवी वसाहतीकडे येतात त्यांना नागरीकानी त्रास देऊ नये, असेकुठे आढळून आल्यास आमच्याकडे माहिती देवून सहकार्य करावे
**( प्रतिक मोडवान, वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर )**



# अपघातग्रस्त युवकाला रुईकरांची लाखमोलाची आर्थिक मदत

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** थोडा उजेड ठेवा, अंधार फार झाला..



पणती जपून ठेवा, अंधार फार झाला.. अशी आपल्याकडे बदलत्या समाज मनाचा आढावा घेणारी कविता प्रसिद्द आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात कुणाला कुणाकडे बघण्यास वेळ नाही. मानवप्राणी सामाजिक बांधिलकी हरवत चालला आहे. मात्र अशा परिस्थितीत केवळ उपचारासाठी गरज लागली म्हणून सामाजिक माध्यमातून एका रात्रीत तब्बल लाखमोलाची आर्थिक मदत करणारे रुई ता.निफाड येथील ग्रामस्थ विरळच.. आज सगळीकडे सामाजिक माध्यमांचा बोलबाला आहे. सामाजिक माध्यमे ही दुधारी शस्त्र आहे. त्याचा चांगल्या कामासाठी उपयोग होण्याऐवजी दुरुपयोग होत आहे. मात्र, रुई येथील आनंद शहाणे यांच्या उपचारासाठी ग्रामस्थांनी 'आम्ही रुईकर' या व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून तब्बल लाखभर रुपयांची आर्थिक मदत जमा केली. रुई गावातील गरीब कुटुंबातील सुवर्णकार समाजाचा ३८ वर्षीय आनंद शहाणे हा नित्यनियमाने आपला कामधंदा आटोपून रुई येथे परतत असतांना दि.९ ऑक्टोबर रोजी नैताळे ते देवगाव रस्त्यावर त्याचा अपघात झाला. आनंद शहाणे व आई दोघेच राहतात. वयोवृद्द आई व कर्त्या मुलाचा असा अपघात झाल्याने आईच्या डोळ्यासमोर अंधार झाला. गरीबांच्या घरी दवाखाना म्हणजे संकटच. त्यातच त्याच्या पायाच्या गुडघ्या खालील भागाचा अक्षरश चेदा मेंदा झालेला, मांडीचा पण तुकडा पडला. आनंद उपचाराअभावी अथवा चांगले उपचार न मिळून घरातच पडला तर त्याचे व वयोवृद्द आईचे काय होईल? ही चिंता ग्रामस्थांना पडल्याने ग्रामस्थांनी त्याला चांगली सुविधा मिळावी या उद्देशाने नाशिक येथील अस्थीरोग तज्ञ डॉ.काकतकर यांचेकडे उपचारासाठी पाठवले. त्याच्या पायावर आजपर्यंत एकूण चार शस्त्रक्रिया झाल्या तरी मात्र, अजून एक शस्त्रक्रिया बाकी आहे. त्यासाठी एकूण पाच ते सहा लाखांचा खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे पोलीस पाटील योगेश झुरळे यांनी 'आम्ही रुईकर' या व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून गावाला मदतीची साद घातली आणि गावातील ग्रामस्थांनी १ लाख ४ हजार रुपयांची आर्थिक मदत पो.पा.योगेश झुरळे, भाऊसाहेब तुकाराम तासकर, बाबासाहेब पोटे, भागवत ठोंबरे यांचेकडे तात्काळ जमा केली व अद्यापही मदतीचा ओघ सुरू आहे. रुईकरांच्या या कृतीतून ऑनलाईनच्या जमान्यातही माणसासाठी चांगल्या माणसांच्या मनात माणुसकी जिवंत असल्याचे दिसून आले. या ग्रुप सारखा आदर्श इतर सामाजिक माध्यम ग्रुप नी देखील घेतल्यास सर्वसामान्यातील सामान्य माणूस म्हणून जगणे आदर्शवत ठरेल.

यापूर्वी येथील नाभिक समाजाच्या ३६ वर्षीय नारायण नामदेव कणसे यांना किडनी विकार झाला होता . त्यांना आईने किडनी दिली . मात्र, किडनी प्रत्यारोपणासाठी येणारा ६ ते ७ लाखांचा खर्च त्यांना पेलवणारा नव्हता . त्यामुळे त्यांच्या किडनी प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेसाठी ही रुई ग्रामस्थांनी याच 'आम्ही रुईकर' याच व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून आर्थिक मदतीचे आवाहन करून तब्बल ३ लाख रुपयांची आर्थिक मदत केली होती . **ज्ञानेश्वर तासकर, सामाजिक कार्यकर्ते**

## जरांगेंचा हल्लाबोल

आधुनिक केसरी

मराठा आरक्षण आंदोलनातील नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील मंत्री छगन भुजबळ यांच्यावर हल्लाबोल केला आहे. जेसीबीने फुलांचा वर्षाव करून स्वागत करण्यावरून होत असलेल्या टीकेवर बोलताना जरांगेंनी भुजबलांचा एकेरी उल्लेख करत टीका केली. तसेच फुलं, जेसीबी पाहणाऱ्यांनी मराठा समाजातील ३२ लाख लोकांना मिळालेले आरक्षणही पहावे, असेही म्हटले. मनोज जरांगे म्हणाले, जेसीबीने फुले टाकून स्वागत करणे हे शक्तीप्रदर्शन नाही. आम्ही एकमेकांशी संवाद साधत आहोत. आम्ही आमच्या समाजातील लेकरांना न्याय मिळावा म्हणून एकत्र येत आहोत. त्याला यात जेसीबी आणि फुलच दिसत आहेत. त्याने आरक्षणही पहावे. त्याचे काय डोळे गेले आहेत का? त्याने आरक्षण द्यायचेही बघावे, तिकडेही लक्ष द्यावे. ३२ लाख लोकांना आरक्षण मिळाले. आयुष्याची भाकरी मिळाली म्हणून आनंदात ते जेसीबी, फुले आणत आहेत. त्याला केवळ जेसीबी दिसत आहेत, ७० वर्षांपासून आरक्षण नाही तेही दिसू दे. तो स्वतः आरक्षण खातो आणि आमचंही आरक्षण बुडाखाली घेऊन बसला आहे. त्याचे काय डोळे गेले आहेत का? हे पोरे त्रास-वेदना सहन करत आहेत. त्याने तेही बघावे, असे मत मनोज जरांगेंनी व्यक्त केले. अवकाळी पाऊस आणि त्यामुळे झालेल्या नुकसानीवर मनोज जरांगे म्हणाले, पावसाने शेतकऱ्यांचे नुकसानही झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. सरकारला विनंती आहे की, त्यांना उघड्यावर पडू देऊ नका. राज्य आणि देश जगवणारा शेतकरी वर्ग आहे. त्यांच्या फार हालअपेष्टा होत आहेत. त्यांना तातडीने निधी द्या. पंचनामेही करा. काही ठिकाणी पंचनामेही सुरू नाहीत. बऱ्याच अधिकाऱ्यांना पंचनामे करायला वेळच नाही वाटते.

## अन्नदात्याकडे दुर्लक्ष का ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**निसर्ग बदलत आहे, तसेच पाऊस, वारे अनियमित होत आहेत, अशा वेळी शेतकऱ्यांना बदलांसाठी तयार करणे महत्त्वाचे आहे. भारतीय शेती अल्प भूधारकांची आहे आणि येत्या काळात यात काही बदल होण्याची शक्यता नाही आणि हाच भूधारक निसर्गाच्या कोपाला अधिकाधिक सामोरे जात सादर होत असतो. त्यासाठी काय करता येईल? गेल्या काही दिवसांपासून- संपूर्ण नोव्हेंबर-२०२३ महिनाभरापासून महाराष्ट्राच्या काही भागात वादळी पावसाचा शेतीला जोरदार तडाखा बसला.**

तो धोका आजही कायमच पाठलाग करीत आहे. अशाप्रकारे जेव्हा शेतातील उभे पीक नष्ट होते, तेव्हा निसर्गावर अवलंबून असणारा शेतकरी एकाएकी हवालदिल होतो. परंतु, विकासाच्या अनेक कल्पना अमलात आणल्यानंतर व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही शेतकऱ्यांना निसर्गापासून वाचण्याचा मार्ग अजून सापडत नाही, ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. सरकारच्या कृषी क्षेत्रातील नीतीचा हा मोठा पराभव मानावा लागेल. म्हणून या निसर्ग आक्रमणाचा व त्यामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीवर गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. नुसते नक्राश्रू दाखवून वेळ मारून नेणे कदापि योग्य नव्हे!

बदलता निसर्गः तसा मानवाला निसर्गबदल नवीन नाही. या बदलांना सामोरे जातच मानवाने प्रगती केली. भारत हा भौगोलिकदृष्ट्या मोठा देश असल्याने कुठे अधिक पाऊस, तर कुठे दुष्काळ, असे चित्र नेहमीच असते. आपला महाराष्ट्रही त्याला अपवाद नाहीच. कोकणात जास्त पाऊस, तर विदर्भ, मराठवाडा कोरडा ठाक असतो. निसर्ग बदलाने महाराष्ट्रातील एकंदरीत पावसाच्या प्रमाणात अजून तरी फारसा बदल झाला नसला, तरी पर्जन्यचक्र मात्र बदलले आहे, हे स्पष्ट होते. विशिष्ट वेळी पाऊस पडण्याऐवजी तो केव्हाही आणि कसाही पडणे, हा या चक्रातील महत्त्वाचा बदल. यात एक-दोन दिवसांत एकदम खूप पाऊस पडणे व पुन्हा खूप दिवस पाऊस न पडणे, हेदेखील पिकांसाठी उपयोगाचे नसते. मार्चमध्ये असा वादळी पाऊस आता नेहमीच होत आहे. हा पाऊस प्रदेशभर सारखा होत नाही व त्याचा परिणामही प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक शेतकऱ्यासाठी वेगवेगळा असतो, हे ध्यानात घेतले पाहिजे. निसर्ग बदलास शेतकरी सदैव सज्ज राहणे गरजेचेः निसर्ग बदलत आहे व पाऊस, वारे अनियमित होत आहेत, अशा वेळी शेतकऱ्यांना अशा बदलासाठी तयार करणे महत्त्वाचे आहे. भारतीय शेती अल्प भूधारकांची आहे आणि येत्या काळात यात काही बदल होण्याची शक्यता नाही आणि हाच भूधारक निसर्गाच्या कोपाला जास्त-जास्त सामोरे जात असतो. यात भर म्हणजे आता स्त्रियाही शेती करू लागल्या आहेत. योजना आखताना याचा विचार होणे तेवढेच गरजेचे आहे. या बदलाच्या तयारीत कमी वेळात पीक घेणे, पिकांचा गरजेनुसार विमा घेणे, जोडउद्योग करणे व सरकारची तात्कालिक मदत मिळण्याची सरकारी व्यवस्था जवळ व कायमस्वरूपाची असणे गरजेचे असेल. बदलता शेतकरी व बदलती शेतीः शेतकरीही आता अगदी पूर्वीसारखा राहिला नाही हेही खरेच. बदललेल्या जीवन पद्धतीने उत्पन्न वाढवण्याची गरज, विकासाच्या नवीन कल्पना, बाजार सुधारणा व नवीन बी-बियाणाची उपलब्धता व पाण्याच्या-विजेच्या सोईसुविधांमुळे शेतकरी नवीन प्रयोग करतो आहे व नवनवीन पिकेही घेतो आहे. त्यासाठी तो खर्चही करतो. त्यामुळे आजची शेती ही केवळ उदरनिर्वाहाची शेती राहिलेली नसून, व्यापारी शेती होत चालली आहे. अशी शेती खर्चिक असते व कुठल्याही कारणाने झालेले नुकसान शेतकऱ्याला भारी पडते. आता शेतकरी साधारण पिकांबरोबर कापूस, सोयाबीन, मका, ऊस, भाजीपाला घेत आहे व फळझाडांची लागवडसुद्धा करत आहे. अवकाळी पावसाने होत असलेले नुकसान म्हणूनच जास्त होत जाते.

अपुरी मदत; अपुरे उपायः भारतात शेतकऱ्यांवर आलेली नैसर्गिक आपत्ती ही एक आपत्ती मानली जाते व त्याकडे आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. या व्यवस्थापनात आपत्ती झाल्यानंतर ती कुठे झाली? कशी झाली? त्यात कुणाचे किती नुकसान झाले वगैरे चौकशींवर भर दिला जातो. यात नुकसान आकलन होऊन मदतीसाठी पावले उचलण्याची भाषा असते व तशी मदत करण्याकडे कल असतो. त्यामुळे नुकसान झाल्याशिवाय कुणी लक्ष देत नाही. नाही म्हणायला सरकारची तात्कालिक मदत व थोडीबहुत विमा योजना कामाला येतात. पण, शेतकरी निश्चिंत होईल, अशा योजना अजून नाहीत. महाराष्ट्रात गेल्या वर्षी जून ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतपिकांचे व फळपिकांचे जे नुकसान झाले, त्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना कमाल दोन हेक्टर क्षेत्रातील शेतपिकांसाठी रु. दहा हजार प्रतिहेक्टर व फळपिकांसाठी रु.२५ हजार प्रतिहेक्टर या दराने नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली होती. या उपायाबरोबरच शेतकर्ज माफ करणे व शेतीसाठी पुन्हा कर्ज मिळवून देणे, असे उपाय केले जातात. व्याजातही सवलती दिल्या जातात. मात्र, याने हा प्रश्न सुटत नाही हे मान्य करावेच लागेल.



पीक विमा योजनाः भारतात पीक विमा योजनेने हा प्रश्न सोडवायचा प्रयत्न झाला. परंतु, त्यात पूर्णपणे यश आले आहे, असे म्हणता येणार नाही. भारतात पीक योजनेचे प्रयोग १९७२-७३ पासून सुरू झाले होते. पण, याला पूर्ण पीक विमा योजनेचे रूप १९८५ मध्ये प्राप्त झाले. त्यालाही आता ३५ वर्षे झाली आहेत. पण, अजूनही समाधानकारक अशी पीक विमा योजना अमलात येऊ शकली नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, जीवन विम्यासारखी ही नफा मिळवून देणारी योजना नाही. त्यामुळे खासगी कंपन्या यात उतरत नाहीत. उतरल्या तरी त्यांना सरकारकडून नुकसानभरपाईची अपेक्षा असते. अगोदरच्या सर्व पीक विमा योजना मुख्यतः बँक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अनिवार्य होत्या व बाकीच्यांसाठी पर्यायी. सध्याची प्रधानमंत्री पीक विमा योजना थोडीशी पुढे जाते. ही योजना सर्व शेतकऱ्यांसाठी पर्यायी आहे व थोडीशी सुधारलेली आहे. राज्य सरकार वाटल्यास काही आगाऊ रिस्क- जोखीम या विमा योजनेत सामावून घेऊ शकते. यातही फार प्रगती झाली आहे, असे दिसत नाही. कॅगच्या सन २०१७च्या एका अहवालानुसार शेतकरी या पीक विमा योजनेत फारसे सामील होत नव्हते. ही संख्या २०-२२ टक्क्यांपेक्षा वाढली नाही. योजनेतील लाभार्थींचा डाटा बरोबर ठेवला जात नव्हता, योजनेची माहिती देण्यापासून ते क्लेम रक्कम शेतकऱ्यांना मिळेपर्यंत सर्वच बाबीत उशीर होत होता व या योजनांवरची देखरेखही कमकुवत होती. एकंदरीतच पीक विमा योजना शेतकऱ्यांना फारशा काही उपयुक्त ठरल्या नाहीत, हेच सत्य!

कायमस्वरूपी मदत व्यवस्था व फंड निकडीचेः सध्या शेतपिकांचे नुकसान एकट्या शेतकऱ्याचे नुकसान समजण्यात येते व त्याला एक तर वाऱ्यावर सोडले जाते किंवा सरकारतर्फे काही तुटपुंजी मदत दिली जाते. पीक विमा घेतला असेल तरी तो सरळ मिळत नाही. त्यामुळे यासाठी कायम व्यवस्था असणे गरजेचे म्हणावे लागेल. शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या विशेषतः शेतकऱ्यांना अधिक उत्पादनासाठी प्रवृत्त करणाऱ्या सर्व घटकांना शेतकऱ्यांच्या या नुकसानीत भागीदार समजण्याची गरज आहे. बी-बियाणे, खत, कीटकनाशक कंपन्या, अन्नधान्य प्रक्रिया करणाऱ्या कंपन्या व त्यात सहभागी होणारे व्यापारी इत्यादी सर्वच शेतकऱ्यांना शेती आधुनिक करण्यासाठी व जास्त उत्पादन घेण्यासाठी बळी पाडत असतात. फायद्यात सगळे सामील असतात. परंतु, नुकसान एकट्या शेतकऱ्याचे होते. हे बदलणे गरजेचे आहे. हे सर्वच नुकसानीला जबाबदार आहेत व सर्वांनीच नुकसानीत शेतकऱ्याची साथ दिली पाहिजे. केवळ पीक विम्याने व सरकारच्या तुटपुंज्या मदतीने हा प्रश्न सुटणार नाही. यासाठी राज्य सरकारने या सर्वांच्या भागीदारीने एक वेगळा दीर्घकालीन फंड निर्माण केला व त्यातून शेतकऱ्यांचे नुकसान सढळपणे भरून काढले तर ते उपयोगी ठरू शकते. तुटपुंज्या मदतीने किंवा सांत्वनाने हा प्रश्न सुटणार नाही. यासाठी राज्य सरकारने या सर्वांच्या भागीदारीने एक वेगळा दीर्घकालीन फंड निर्माण केला व त्यातून शेतकऱ्यांचे नुकसान सढळपणे भरून काढले तर ते उपयोगी ठरू शकते. शेतकरी हवालदिल आणि असहाय्य न रहावाः राज्य सरकार आपत्तीनंतर मदत जाहीर करत असले, तरी या प्रक्रियेत शेतकरी शासनाधीन व असाहाय्य असतो. क्वचित भ्रष्टाचारालाही बळी पडतो. हे थांबण्यासाठी पीक विमा विस्तारित व सरळ करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सरकारची मदत व्यवस्था कायमस्वरूपी कार्यरत असणे व मदतीचे निकष स्पष्ट व पारदर्शक असणे गरजेचे आहे. यात कुठे एकट्या शेतकऱ्याचे नुकसान झाले असेल तरी ते भरून देण्याची व्यवस्था असली पाहिजे. बदलत्या निसर्गचक्राला थांबवणे कदाचित अवघड आहे. मात्र, शासनामार्फत शेतकऱ्यांच्या मदतीची व्यवस्था करणे शक्य आहे व ती केली पाहिजे, असे तज्ज्ञांसह अनेकांना वाटते. म्हणून सांगावेसे वाटले, "बा सरकारा, तुझे सहानुभूतीपूर्वक लक्ष माझ्या प्राणप्रिय अन्नदात्याकडे सदोदित राहू दे रेऽऽऽ...!"

## प्रदूषण बनला मानवी घटकाचा राक्षस



दिनेश जयराम हुमणे
संपर्क क्र. 9833557044

आधुनिक केसरी

**प्रदुषणाच्या समस्येने फक्त भारतालाच नव्हे, तर संपूर्ण जगालाच वेठीला धरलं आहे. अगदीच सोप्या भाषेत सांगायचं झालं तर प्रदूषण म्हणजे अशी स्थिती जिथे नैसर्गिक गोष्टी जसं की हवा, पाणी आणि खाण्याच्या गोष्टी अशुद्ध होणे. त्यातून अशुद्धी पसरेल आणि आपल्या आरोग्यासाठी ते हानीकारक बनेल. प्रदुषण अनेक कारणांनी होतं जसं की फटाके फोडणे, हवा-पाण्यात रासायनिक घटक सोडणे, अवाजवी आवाज करणे, विघटन न होऊ शकणारे घटकांचे प्रमाण वाढणे, जास्त प्रमाणात प्रदूषण झाले की खोकला, दमा, श्वास घेण्यास त्रास इ. अलिकडे प्रदुषणाची ही समस्या दिवसेंदिवस अधिकच वाढतच चालली आहे. ही सरकारची तसेच सामान्य नागरिकांची देखील जबाबदारी आहे की त्यांनी प्रदुषणावर नियंत्रण प्राप्त करण्यासाठी उपाय करावेत.**

यासाठी योजना अंमलात आणाव्यात. झाडेही मोठ्या प्रमाणात लावली पाहिजेत. जेणे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. या दिवसाचा मुख्य उद्देश हा आहे की लोकांना वाढत्या प्रदुषणाबाबत अधिकाधिक जनजागृती व्हावी, लोकांना जागरूक करावं, हवा, पाणी, ध्वनी या माध्यमात होणारे प्रदूषण फक्त माणसालाच नव्हे तर संपूर्ण निसर्गावर नकारात्मक परिणाम करण्यास कारणीभूत ठरते. याची जाणीव लोकांमध्ये व्हावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. वास्तविकतः या दिवसाला भोपाळ वायू दुर्घटनेच्या आठवणीत साजरा केलं जातं.

भोपाळ वायू दुर्घटना ही जगातील सर्वांत मोठी औद्योगिक दुर्घटना होती. यामध्ये मिथाईल आयसो सायनेट नावाचा एक विषारी वायू मोठ्या प्रमाणावर बाहेर पडला होता. ज्यामुळे अनेक लोकांचा मृत्यू झाला होता. अनेक लोक अत्यावस्थ जखमी झाले होते. तर त्यानंतरच्या अनेक पिढ्यांना अंपगत्व आलं होतं. भोपाळ वायू दुर्घटना 2 डिसेंबर 1984 रोजी भोपळमध्ये युनियन कार्बाईड कंपनीमधून मिथाईल आयसो सायनेट या वायूची गळती झाली होती. या दुर्घटने हजारो लोकांचा मृत्यू झाला होता. यामुळे हजारो लोकांना सामुहिकरित्या दफन केलं गेलं होतं. काही दिवसांनंतरच जवळपास दोन हजार जनावरांचे मृतदेह देखील दफन करावे लागले होते. आसपासच्या परिसरातील झाडे मरुन गेली होती. एकावेळेला जवळपास 17 हजार लोकांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं गेलं होतं. सरकारी आकड्यानुसार 2,500 आसपास लोकांचा मृत्यू या दुर्घटनेत झाला होता. आज देशभरात राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस साजरा केला जात आहे. 2-3 डिसेंबर रोजी भोपाळ गॅस दुर्घटनेत प्राण गमावलेल्या लोकांच्या स्मरणार्थ दरवर्षी 2 डिसेंबर रोजी भारतात राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस साजरा केला जातो. लोकांना प्रदूषण रोखण्यास मदत करणाऱ्या कायद्यांची जाणीव करून देणे, औद्योगिक आपत्तींचे व्यवस्थापन आणि नियंत्रण याबाबत जागरूकता पसरवणे आणि औद्योगिक प्रक्रिया आणि मानवी निष्काळजीपणामुळे होणारे प्रदूषण रोखणे हे राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस साजरा करण्याचे उद्देश आहेत 2006 मध्ये सरकारने कोर्टात एक प्रतिज्ञापत्र दिलं होतं ज्यात उल्लेख केला होता की वायूगळतीमुळे एकूण 5,58,125 लोक जखमी झाले आहेत. यामधील 38,487 लोक हे काही काळासाठी अंपग झाले. तर 3,900 लोक हे कायमचेच अपंग झाले. ही दुर्घटना फक्त एवढ्यापुरतीच मर्यादीत नव्हती. तर त्यांच्यानंतर जन्माला येणाऱ्या मुलांमध्येही गंभीर प्रकारच्या आरोग्याच्या समस्या पहायला मिळाल्या. यामुळे शासनाने कठोर पावले उचलली पाहिजेत, नागरिकांनी वेळोवेळी लक्षात येताच आधीच मोठ्यात मोठ्या व्यक्तीच्या कानावर ही गोष्ट टाकली पाहिजे तरचं प्रदूषण नियंत्रणात राहील.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जरांगे पाटील, जरा विचार करा; २४ डिसेंबरवर अडून बसू नका !

## आज़ाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद लोंढे : भीमा कोरेगाव शौर्यदिनावर सावट आणू नका !

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सध्या राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न मोठ्या चर्चेचा



बनला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथून सुरु केलेल्या आंदोलनाला जनआंदोलनाचे स्वरूप सकल मराठा समाजाने दिले आहे. मनोज जरांगे पाटीलांनी सरकारचे वायदे व तारखांना आजमावून पाहिल्याने काहीही फायदा होत नसल्याचे लक्षात येताच आता राज्यभर दौरे सुरु केले आहेत. मराठा आरक्षणाचा विषय धुमसत ठेवून जरांगेंनी सरकारला २४ डिसेंबर २०२३ ही अंतिम मुदत दिली आहे. महाराष्ट्र सरकार तुम्हाला २ जानेवारी सांगत होते. परंतु तुम्ही २४ डिसेंबर या तारखेवर अडून बसला आहात. त्यामुळे हे आंदोलन वेगळ्या वळणावर जाईल. मराठा आरक्षण आंदोलनाला आजाद समाज पार्टीचा पाठिंबाच आहे. एवढेच काय कोणत्याही प्रवर्गाच्या आरक्षणाला आमचा विरोध नाही. परंतु जरांगे पाटीलांनी सरकारला दिलेल्या २४ डिसेंबरच्या मुदतीबाबत आम्हाला काही महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधावेसे वाटते.

राज्यात भीमा कोरेगावचा प्रश्न पेटल्यावर राज्यभर वातावरण पेटले होते. १ जानेवारी २०१८ रोजी भीमा-कोरेगावच्या लढाईचा २०० वा शौर्य दिन साजरा करण्यासाठी आंबेडकरी समाजातील लाखों अनुयायी जमले होते. यावेळी भीमा- कोरेगाव विजयस्तंभाकडे जाणाऱ्या आंबेडकरी समुदायाच्या वाहनांवर जातीयवाद्यांनी पूर्वनियोजित कट रचून जोरदार हल्ला केला. लहान, मोठे भीम अनुयायी व महीला यात मोठ्या संख्येने गंभीर जखमी झाले होते. यानंतर राज्यभर याचे तीव्र प्रतिसाद उमटत मोठमोठे आंदोलने व मोर्चे निघाले होते. तेव्हापासून ३१ डिसेंबरला भीमा कोरेगावला अभिवादनासाठी जाणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांच्या संख्येत दरवर्षी लाखोंनी वाढ होत आहे. भीमा कोरेगाव येथे राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशाच्या इतर भागातून लाखोंच्या संख्येने भिमसैनिक अभिवादनासाठी येतात. भीमा कोरेगावकडे जाणारे सर्वच रस्ते हाऊसफुल्ल होतात. साधारणतः २४ डिसेंबरपासून भीमसैनिकांचा भीमा कोरेगावकडे प्रवास सुरु होतो. यात पायी येणाऱ्यांची संख्या लक्षणीय असते. कोरेगावच्या विजयस्तंभाला मानवंदना देत अभिवादन करून २ ते ३ जानेवारी पर्यंत सारे आपापल्या मार्गी परततात. याच कालावधीत मनोज जरांगे पाटीलांचे मराठा आरक्षण आंदोलन मुंबईच्या दिशेने कूच करणार आहे. ही देखील संख्या लक्षणीय असेल. हे आंदोलक भीमा कोरेगावकडून येणाऱ्या-जाणाऱ्या मार्गावरून जातील. भीमसैनिक आणि मराठा आंदोलक यांची संख्या पाहता त्यांना आपसात काही कटकारस्थान रचून लढविण्याचे षडयंत्र विघ्नसंतोषी जातीय प्रवृत्ती आखत असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जातीय प्रवृतींकडून मराठा आणि भीमसैनिक यांच्यात संघर्ष निर्माण करून मराठा आरक्षणाचा प्रश्न चिघळविण्याची शक्यता आहे. दंगली घडविण्याचा देखील डाव असू शकतो. किंबहुना मराठा आरक्षण आंदोलन दडपण्याचे कट-कारस्थान देखील असू शकते. कारण आंबेडकरी जनतेचा मराठा आरक्षण आंदोलनाला कसलाही विरोध नसून पाठींबाच आहे. परंतु जरांगेंच्या मंचावर येऊन गेलेले संभाजी भिडे किंवा भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपी मिलिंद एकबोटे यांना मात्र कडाडून विरोध आहे. नेमके हेच हेरून जरांगेंविषयी दलित जनतेच्या मनात विष पेरले जाऊ शकते. यातून भीमा कोरेगाव व मराठा आरक्षण आंदोलन यात आग लावण्याचा प्रयत्न केला जाण्याची दाट शक्यता आहे. यातून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न पुढे करून आंदोलकांना अटक होऊ शकते. यातून आंदोलन सरकारदरबारी लेखी बदनाम होईल. त्यामुळे जरांगेंनी सरकारला दिलेली २४ डिसेंबरची मुदत ही फार मोठी रिस्क आहे. यातून मराठा आंदोलनाची दिशा भरकटून ते सैरभैर होईल. जातीय व्यवस्थेचा अजेंडा राबविणाऱ्यांना नेमके हेच हवे आहे. कारण मुळात मराठा समाजाला आरक्षण मिळू देण्याची त्यांची अजिबात इच्छा नाही. म्हणूनच डावपेच लक्षात घेता जरांगेंनी २४ डिसेंबरची मुदत ५ जानेवारीपर्यंत पुढे नेली तर मराठा आरक्षण विरोधकांचे मनसुभे उधळून लावत मराठा आरक्षण आंदोलनाला एक निश्चित अशी दिशा प्राप्त होईल. जरांगेंनी थेट 'करा व मरा' अशी भूमिका न घेता जर गनिमी काव्याने लढले तर सरकारकडे मराठा समाजाला आरक्षण देण्याशिवाय पर्यायच राहणार नाही. किंबहुना ते द्यावेच लागेल. म्हणून जरांगे पाटीलांनी २४ डिसेंबरच्या मुदतीबाबत एक पाऊल मागे घेतले तर ते फायदेशीर राहील.मात्र २४ डिसेंबरच्या मुदतीबाबत ताठर भूमिका घेतल्यास कपाळमोक्षच होईल आणि होणाऱ्या परिणामांची जबाबदारी मनोज जरांगे पाटील यांच्या माथी मारली जाईल. याबाबतीत आपण आमच्या आझाद समाज पार्टीच्या पदाधिकाऱ्यांशी धुळ्यातील आपल्या दौऱ्यादरम्यान चर्चा करून धुळे येथील जाहीर सभेत याबाबत स्पष्टीकरणही द्यावे. म्हणून आजाद समाज पार्टीचे जरांगे पाटीलांना जाहीर आवाहन आहे की जरा लक्षपूर्वक विचार करून आपल्या आंदोलनाची दिशा ठरवा व योग्य परिणाम साधू शकेल असा निर्णय घ्या. आमचा आपल्या आंदोलनाला पाठिंबा आहेच!!

# इगतपुरी आगाराच्या अनागोंदी कारभाराने गाठला कळस

## विद्यार्थ्यांसह प्रवाशाचें प्रचंड हाल

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** येथील आगाराच्या अनागोंदी कारभाराचा कळस झाला आहे. संपुर्णपणे एस.टी.फेर्याचें नियोजन ढासळले असुन, वेळापत्रक शोभेचे ठरत आहे. दरम्यान ईगतपुरी आगाराच्या अनागोंदी कारभाराचा तीव्र फटका शालेय विदयार्थ्यांसह प्रवाशानां बसत आहे.



एकीकडे एस.टी.कडे प्रवाशी आकर्षित व्हावे यासाठी शासन विविध सवलती देत आहेत. यात जेष्ठ नागरिकानां मोफत , महिलानां अर्धे दरात प्रवासाची सवलत आदीसह दिव्यांग, शालेय विद्यार्थी यांना प्रवास दरात सवलत देत आहेत. या सवलतीमुळे एस.टी.कडे प्रवाशी वर्ग मोठया प्रमाणावर आकर्षित झालेला आहे. मात्र ईगतपुरी आगारात नियोजनाअभावी अनागोंदी कारभाराचा कळस झाला आहे. मोठया संख्येने प्रवाशी एस.टी.कडे वळत असतानां ईगतपुरी आगाराच्या करंटेपणामुळे याचा लाभ आगाराला उठवता येत नसल्याचे चित्र दिसून येते आहे. यामुळे नाईलाजाने एसटीकडे पाठ फिरवुन प्रवाशानां खाजगी वाहनाचां आधार घ्यावा लागत आहे. कुठलीही बस वेळेवर न येणे, बसेस अचानक रद्द होणे, प्रवासादरम्यान बस नादुरुस्त होणे आदी प्रकार सर्रास घडत असुन यामुळे प्रवाशानां विनाकारण मनस्ताप सहन करावा लागतो आहे. मोफत सवलतीच्या आशेने जेष्ठ नागरिकानां तासनतास बस स्थानकावर खोळंबुन रहावे लागते आहे तर शालेय विदयार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. ईगतपुरी आगाराच्या अनागोंदी व मनमानी कारभाराला कुठलाही धरबंद राहिलेला नसुन सौजन्य सप्ताह राबवण्याचा शहाजोगपणा करणारे आगाराचे आधिकारी व कर्मचारी तक्रारदारानांच उद्धट उत्तरे देत आहे. बस चालक, वाहक नादुरुस्त बसेसचे कारण सांगतात, तर दुरुस्ती कामगार बसेसच जीर्ण असल्याने दुरुस्त तरी किती कराव्यात असा सवाल करत आहे. तर दुसरीकडे लांब पल्ल्याच्या बसेस मात्र सुरळीत सुरु असुन हा आगार तालुक्यातील जनतेच्या सोईसाठी आहे कि बाहेरच्या प्रवाशांसाठी असा संताप प्रवासी व्यक्त करत आहे.

**सवलती काय देता ? दर्जा सुधरवा :** ईगतपुरी आगाराच्या अनागोंदी कारभाराबाबत सातत्याने तक्रारी करुनही आगाराचे मात्र हम नही सुधरेंगे हे अडेलतट्टु पणाचे धोरण सुरु आहे . सरकार विविध सवलती देत असताना ईगतपुरी आगार मात्र या सेवेचा लाभ प्रवाशानां मिळु नये असेच बेताल वर्तन करत आहे . आगाराने आपल्या कारभाराचा दर्जा न सुधरवल्यास १ जानेवारी २०२४ पासुन ईगतपुरी आगाराच्या दालनासमोर आंदोलन करणेत येईल . **नवनाथ गायकर, सामाजिक कार्यकर्ते**

# शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई तत्काळ द्या : मापारी

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** दोन दिवसांपूर्वी बुलडाणा जिल्ह्यासह लोणार तालुक्यात अवकाळी पावसासह मोठ्या आकराच्या गारपिटीने सर्वत्र धुमाकूळ घातला आहे. जिल्ह्यातील लोणार, सिंदखेड राजा, नांदुरा, दे. राजा या तालुक्या मधील हजारो हेक्टर शेतजमिनी वरील उभी पिके अवकाळी पावासने झोपवली आहे. शेतातील सोलर पैनल चे नुकसान झाले आहे. शिवाय जनावरे दगावली आहे. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यातील नुकसान ग्रस्त शेतकन्यां झालेल्या नुकसानीची भरपाई तात्काळ मिळवून देण्याची मागणी राज्याचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या कड़े निवेदना द्वारे युवक काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी यांनी आज केली आहे. राज्याचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार हे आज अवकाळी पावसाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीचे केलेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी सिंदखेड राजा येथे आले होते दरम्यान जिल्हा युवक काँग्रेस चे अध्यक्ष अनिकेत मापारी यांनी त्यांना निवेदन दिले. यावेळी त्यांच्या सोबत शहर कॉंग्रेसचे शहराध्यक्ष शेख समद, युवक काँग्रेसचे अध्यक्ष विकास मोरे हे उपस्थित होते. पावसाळ्यात अल्प प्रमाणात पडलेल्या पावसाने खरीप हंगामात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याचे उत्पादन घटले त्यात आता अवकाळी पावसाने तुर, रब्बितील गहू, कांदा, हरभरा, मका, कापूस, नेट शेड मधील मिर्ची, टमाटर, भेंडी, भाजीपाला अशा सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. बुलडाणा जिल्ह्यात सोमवार पासून वादळी पावसासह मोठ्या



स्वरुपात गारपीट झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील महागड़े सोलर पंपाच्या पॅनल चे नुकसान झाले आहे. अवेळी आलेल्या पावसामुळे शेतकन्यांचे झालेले नुकसान हे न भरून येणारे आहे. खरीप हातातून गेल्याने सर्व आशा गहु, तुर, ज्वारी, हरभरा, कांदा, कापूस, मका या पीकांसह फळ आणि भाजीपाला पिकांचे झालेलं नुकसानीने शेतकऱ्यांचा हाता तोंडाशी आलेला घास अवकाळीने हिरावून घेतला आहे. आशा परिस्थिति मध्ये अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची आस लागून आहे. शेतकऱ्यांना मदतीसाठी शासनाकड़े पाठपुरावा करण्याची मागणी ही अनिकेत मापारी यांनी केली आहे.


# दुष्काळात तेरावा महिना : अवकाळीने केले प्रचंड नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील तीन महसूल मंडळ बाजार सावंगी, सुलतानपूर वेरुळ येथे दोनतीन दिवस झालेल्या वादळीवारा विजेची कडकडाट ढगांची गडगडाट सह झालेल्या अवकाळी पावसाने रब्बी पिक तथा पालेभाज्या चे प्रचंड नुकसान केलेआहे. सर्वाधिक बाजार सावंगी महसूल मंडळ तर सुलतानपूर मध्यम व वेरुळ मंडळमधे कमी अवकाळी पाऊस झाला सावंगी मंडळ मधे अधिकच्या अवकाळी पावसाने फुटलेल्य कापसाच्या वाता झाल्या आहे. तर मका, तुर, उस, टमाटे, हिरवा भाजीपाला, पपाई, फळबागे यांची अक्षरशः वाट लावली आहे. प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.महागडे बि बियाणे खते औषधी मजुरी खर्च मरमर मेहनत करुन निसर्गाने आर्थिक फटका दिला आहे.गत चार महिने पावसाळ्याचे गेले नद्या नाल्यांना पुरपाणी आले नाही कि मोठा पाऊस झाला नाही.मात्र अवकाळीने अचानक दिलेल्या अवकाळी मुसळधार पावसाने सर्वत्र पाणीच पाणी केले व नदीनाल्याने दोन दिवस पुरपाणी आले. याचा फायदा रब्बी पिकासाठी होवु शकतं.परंतु झालेल्या पिकांची पाहणी पंचनामा साठी अद्याप कुणी शेत बांध वर घटनास्थळी पोहचलं नाही व सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी नागरिकांतुन व शेतकऱ्यांतून होत आहे.तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी मा मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी स्विकारली असली तरी जिल्हा अधिकारी प्रशासनस्तरी बाजार सावंगी महसूल मंडळ मधे अद्याप शेती मालाचे पाहणी पंचनामे सुरु झाले नाही.

महाराष्ट्र Business Katta









# ५३० कोटी मोबाईल कचऱ्याच्या डब्यात



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आज मोबाईल फोन इतका महत्वाचा झाला आहे की जगात क्वचितच कोणी असेल जो मोबाईल वापरत नाही. अर्थात या मोबाईलमुळे आपली बरीच कामे सोपी झाली आहेत, पण अनेक नवीन समस्याही आणल्या आहेत. यापैकी एक म्हणजे वेगाने वाढणारा इलेक्ट्रॉनिक कचरा. जगभरात 1,600 कोटींहून अधिक मोबाईल फोन वापरले जात आहेत, त्यापैकी सुमारे एक तृतीयांश म्हणजेच 530 कोटी या वर्षी कचऱ्यात फेकले जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.आणखी एका रंजक गोष्ट म्हणजे हे सर्व टाकून दिलेले मोबाईल फोन एकमेकांच्या वर ठेवले तर त्यांची एकूण उंची सुमारे 50 हजार किलोमीटर असेल, जी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापेक्षा सुमारे 120 पट जास्त असेल.**

जर आपण त्याची चंद्राच्या अंतराशी तुलना केली तर तो त्याच्या सुमारे एक आठवा भाग व्यापेल. इंटरनॅशनल वेस्ट इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक इक्विपमेंट फोरम (डब्लूइइ -WEEE) ने जारी केलेल्या अहवालात ही माहिती समोर आली आहे. डब्लूइइ (WEEE) अहवाल, आंतरराष्ट्रीय व्यापार डेटावर आधारित असून हा "ई-कचरा" मुळे वाढत्या पर्यावरणीय समस्यांवर प्रकाश टाकतो. अनेकजण जुने फोन रिसायकलिंग करण्याऐवजी स्वतःकडे तसेच ठेवू देतात, त्यामुळे हा कचरा वर्षानुवर्षे वाढत असल्याचे समोर आले आहे. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की ग्राहकांकडून वारंवार गोळा केलेल्या छोट्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनांमध्ये मोबाईल फोन चौथ्या क्रमांकावर आहे. तसं पाहिलं तर जगभरातील वाढता इलेक्ट्रॉनिक कचरा ही एक मोठी समस्या बनत चालली आहे. समस्या या इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वापरात नाही तर आपण ज्या प्रकारे वापरत आहोत आणि त्यांचे व्यवस्थापन करत आहोत त्यामुळे समस्या निर्माण होत आहे. या इलेक्ट्रॉनिक गॅझेट्सबद्दलची आमची वाढती ओढ हे समस्यांचे कारण आहे. आकडेवारीनुसार, 2022 मध्ये उत्पादित सेल फोन, इलेक्ट्रिक टूथब्रश, टोस्टर आणि कॅमेरा इत्यादीसारख्या लहान इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे एकूण वजन सुमारे 24.5 दशलक्ष टन इतके आहे, जे गिझाच्या ग्रेट पिरॅमिडच्या वजनाच्या चार पट आहे. जगभरातील एकूण इलेक्ट्रॉनिक कचऱ्यापैकी सुमारे 8 टक्के या



छोट्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनांचा वाटा आहे. इंटरनॅशनल वेस्ट इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक इक्विपमेंट फोरम (WEEE) संशोधकांनी जाहीर केलेल्या अंदाजानुसार, 2021 मध्ये 57 दशलक्ष टनांपेक्षा जास्त इलेक्ट्रॉनिक कचरा निर्माण झाला. असा अंदाज आहे की निरुपयोगी इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या या पर्वताचे वजन चीनच्या ग्रेट वॉलपेक्षा जास्त आहे, जी पृथ्वीवर मानवाने बांधलेली सर्वात जड वस्तू आहे. 2020 मध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्लोबल ई-वेस्ट मॉनिटरच्या अहवालानुसार, 2019 मध्ये सुमारे 54 दशलक्ष मेट्रिक टन इलेक्ट्रॉनिक कचरा निर्माण झाला. तसे पाहिल्यास 2014 पासून गेल्या पाच वर्षांत हा इलेक्ट्रॉनिक कचरा सुमारे 21 टक्क्यांनी वाढला आहे. 2030 पर्यंत हा कचरा 74 दशलक्ष मेट्रिक टनांपर्यंत वाढेल असा अंदाज आहे. 2019 मध्ये जागतिक स्तरावर केवळ 17.4 टक्के इलेक्ट्रॉनिक कचरा गोळा केला गेला आणि त्याचा पुनर्वापर केला गेला. याचा अर्थ असा की कचऱ्यामध्ये असलेले लोखंड, तांबे, चांदी, सोने आणि इतर मौल्यवान धातूंपैकी उर्वरित 82.6 टक्के कचरा टाकण्यात आला किंवा जाळला गेला.

भारतातीळ इ-कचऱ्याविषयी बोलायचं तर, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) डिसेंबर 2020 मध्ये जारी केलेल्या अहवालात असे दिसून आले आहे की 2019-20 मध्ये भारतात सुमारे 10.1 लाख टन इलेक्ट्रॉनिक कचरा निर्माण झाला होता. 2017-18 मध्ये ते 25,325 टन आणि 2018-19 मध्ये 78,281 टन होते. 2018 मध्ये भारताने केवळ 3 टक्के ई-कचरा गोळा केला होता, तर 2019 मध्ये हा आकडा केवळ 10 टक्के होता. हे स्पष्ट आहे की देशात मोठ्या प्रमाणात हा कचरा गोळा केला जात नाही, रिसायकलिंग तर सोडूनच द्या. अशा परिस्थितीत या कचऱ्यामध्ये जे मौल्यवान धातू आहेत ते वाया जातात. साहजिकच यामुळे संसाधनांचा अपव्यय होत आहे. आपण या संसाधनांचा पुनर्वापर करू शकतो. 2019 मध्ये इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचा पुनर्वापर न केल्यामुळे झालेल्या नुकसानाबद्दल बोलायचे झाले तर ते सुमारे 4.3 लाख कोटी रुपये आहे, जे जगातील अनेक देशांच्या जीडीपीपेक्षा जास्त आहे.

या संदर्भात युनिटारचे प्रमुख डॉ. रुएडिगर कुहर म्हणतात की, जर आपण या समस्येचे योग्य व्यवस्थापन केले नाही तर पुढील 30 वर्षांत या वाढत्या जागतिक ई-कचऱ्याचे प्रमाण दुप्पट होऊन 100 दशलक्ष टन होईल. अनेक देशांमध्ये इलेक्ट्रॉनिक्सचा वापर झपाट्याने वाढत आहे. ही अधिकाधिक गॅजेट्स आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादनेही वाढत्या ई-कचऱ्यात भर घालत आहेत. या वाढत्या समस्येचा गांभीर्याने विचार करायला हवा. याला सामोरे जाण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. राष्ट्रीय अधिकारी, अंमलबजावणी संस्था, उपकरणे उत्पादक, पुनर्वापर करणारे, संशोधक तसेच ग्राहकांनी त्यांचे व्यवस्थापन आणि पुनर्वापरात योगदान देणे आवश्यक आहे

# एक्झिट पोलचा अन्वयार्थ



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**लोकसभेची रंगीत तालीम अर्थात उपांत्य फेरी म्हणून ज्या पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीकडे पाहिले जात होते त्या राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा आणि मिझोरम या राज्यातील निवडणुका संपल्या असून उद्या म्हणजे ३ डिसेंबरला या राज्यातील निवडणुकांचा निकाल आपल्या हाती येईल. तुमच्या हातात हा लेख पडेपर्यंत निकालाचा कल स्पष्ट झाला असेल. निकाल जरी उद्या असला तरी अनेक न्युज चॅनलने सर्व्हे करणाऱ्या संस्थांमार्फत सर्व्हे करून एक्झीट पोल जाहीर केला आहे.**

या एक्झीट पोल नुसार राजस्थान वगळता उरलेल्या चार राज्यात भाजपला सत्ता मिळणार नाही. राजस्थानमध्ये भाजप गहेलोत सरकारला हटवून सत्ता काबीज करेल अर्थात राजस्थानमध्ये दर पाच वर्षांनी नवे सरकार येते. तेथील जनता आलटून पालटून भाजप व काँग्रेसला संधी देते हा इतिहास आहे. मागील वेळेस तिथे काँग्रेसचे सरकार आले होते त्यामुळे या वेळी तिथे भाजपचे सरकार येईल हा एक्झीट पोलचा निष्कर्ष खरा ठरू शकतो अर्थात दोन्ही पक्षात अटीतटीची लढाई होईल हे उघड आहे. भाजपला राजस्थानात सत्ता मिळत असली तरी मध्यप्रदेश मधून त्यांची सत्ता जाणार आहे असाही निष्कर्ष या एक्झीट पोलमध्ये काढण्यात आला आहे वास्तविक मागील वेळी तिथे काँग्रेसला जनतेने निवडून दिले होते मात्र भाजपने जनतेच्या आदेशाचा अनादर करत ऑपरेशन लोटसचा प्रयोग करून काँग्रेसचे सरकार हटवले आणि शिवराज सिंग चौहान यांना मुख्यमंत्री केले. ज्योतिरादित्य सिंधिया या मोठ्या माशाला गळाला लावून भाजपने मध्यप्रदेशात सत्ता स्थापन केली मात्र तेथील विद्यमान मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याविषयी जनतेच्या मनात कमालीची नाराजी होती त्यातून भाजपने राबवलेले ऑपरेशन लोटस जनतेला आवडले नाही त्यामुळे भाजपला तिथे मोठा फटका बसण्याची चिन्हं आहेत. भाजपच्या हातात असलेले हे मोठे राज्य काँग्रेसकडे गेले तर तो भाजपसाठी मोठा झटका असेल. मध्यप्रदेशला चिकटून असलेले एकेकळी मध्यप्रदेशचाच एक भाग असलेले छत्तीसगड राज्यात मात्र काँग्रेसचे सरकार होते आणि यापुढेही काँग्रेसचेच सरकार राहील असे चिन्हं दिसत आहे. छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश सिंग बघेल यांचे काम चांगले आहे त्याची पोचपावती मतदार मतपेटीतून देतील अर्थात मागील वेळेसारखा दणदणीत विजय नसला तरी काँगेसला स्पष्ट बहुमत मिळेल. दक्षिणेतील महत्वाचे राज्य असलेल्या तेलंगणामध्ये काँग्रेस दहा वर्षांनी पुनरागमन करेल तेथील के सी आर सरकारला जनता कंटाळली आहे अर्थात के सी आर यांनी अनेक चांगल्या योजना राबवल्या मात्र अँटी इनकंबसीचा फटका त्यांना बसेल इथे अटीतटीची लढत होईल काँग्रेसला सत्ता स्थापन करण्यासाठी काही जागा कमी पडतील मात्र एम आय एम आणि अपक्षांच्या मदतीने काँगेस सत्तेचा सोपान चढेल. भाजपला मात्र येथे अतिशय कमी जागा मिळतील. ईशान्येकडील मिझोरम राज्यात त्रिशंकू अवस्था निर्माण होईल मात्र सत्ताधारी मिझो नॅशनल फ्रंट अपक्षांच्या मदतीने सत्ता स्थापन करेल अर्थात हा झाला अंदाज. एक्झीट पोल प्रमाणेच निकाल हाती येईल असे नाही मात्र बऱ्याचदा एक्झीट पोल चे निकाल अचूक आले आहेत. ९० टक्के राजकीय विधलेशकांनी देखील निकाल असेच लागतील असा अंदाज वर्तवला आहे अर्थात घोडा मैदान जवळ आहे. कोण जिंकणार - कोण हरणार, कोणाची सत्ता जाणार - कोणाची सत्ता येणार, कोणाला मतदार




कौल देणार - कोणाला झटका देणार हे चोवीस तासात कळेलच एक मात्र नक्की ही निवडणूक भारतीय राजकारणाच्या दृष्टीने दूरगामी परिणाम करणारी ठरेल. जर या निवडणुकीत एक्झीट पोलप्रमाणे भाजपला फटका बसला तर इंडिया आघाडी आणखी बळकट होईल. इंडिया आघाडीचे घटक पक्ष वाढतील आणि लोकसभा निवडणूक भाजपला आणखी जड जाईल मात्र या उलट जर भाजपने आश्चर्यचकित करणारी कामगिरी केली तर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीला भाजप मोठ्या आत्मविश्वासाने समोरा जाईल आणि केंद्रात पुन्हा मोदी सरकार बहुमताने येईल.

# शेतकऱ्यांच्या नशिबी दुष्काळ नाहीतर अतिवृष्टी...

आधुनिक केसरी



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

यावर्षी महाराष्ट्रातील काही भागात पाऊस काळ खूपच कमी प्रमाणात झाल्यामुळे व खरीपातील पिके पाण्यावाचून पार करपून गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला यंदा काहीच आले नाही. शेतकऱ्यांच्या नशिबी यंदा दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. कापूस, सोयाबीन, मुग व उडीद यंदा जोमात आले होते.परंतु पावसाने ऐनवेळी दगा दिल्यामुळे शेतातील उभी पिके उन्हाच्या तडाख्याने जाग्यावरच जळून खाक झाले आहेत.त्यामुळे शेतकरी दादा अतिशय हवालदील व अस्वस्थ झाले आहेत.मृग नक्षत्रात हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार शेतकऱ्यांनी शेतात पेरणी केली खरी पण महाराष्ट्रातील काही भागातून पावसाने काढता पाय घेतल्यामुळे जोमात आलेली सारी पिके कोमात गेली.तेव्हा काही भागातील शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली.तेव्हा महाराष्ट्रात पाऊस कसाबसा थोडाफार पडला व शेतकरी दादा आनंदीत झाले. शेतातील सगळा शिवार हिरवळीने नटून गेला होता. पिके उगवून बाहेर निघाली होती. पाऊस पडेल या हेतूने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या.आणि पिकांनाही आता पाण्याची गरज भासू



लागली होती आणि नेमक्या याच काळात पावसाने दडी मारल्याने तमाम शेतकरी मेटाकूटीला येऊन, निराश झाले होते. शेतकरी दादा आभाळाकडे लक्ष देऊन होते पण पाऊस काही पडत नव्हता. उन्हाचा तडाखा तर जोरात होता. काळ्या मायच्या पोटातून उगवलेली पिके उन्हाच्या तडाख्याने पार जळून खाक झाली. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले. काही शेतकरी कर्जबाजारी झाले व काही शेतकऱ्यांनी रीन काढून दिवाळी सारखे सण साजरे केले. मायबाप सरकारला सुध्दा शेतकऱ्यांची जराही काळजी राहीली नाही. ते राजकारण करण्यातच व्यस्त आहेत. त्यांना शेतकऱ्यांकडे लक्ष द्यायला वेळ नाही.असेच म्हणावे लागेल. शेतकऱ्यांच्या नशीबात एक तर दुष्काळ असतो नाहीतर अतिवृष्टी. दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे रब्बी हंगामात देखील शेतकऱ्यांनी पेरणी केली खरी पण कालपरवा झालेल्या अतिवृष्टीच्या तडाख्याने रब्बी हंगामातील पिके पूर्णपणे भुईसपाट झाली आहेत. शेतकऱ्यांनी शेतात केलेल्या खर्चाचे काही मोल झाले नाही. उलट शेतकऱ्यांनी केलेला खर्च व्यर्थ गेला आहे. यंदा शेतकरी दुहेरी संकटात सापडल्यामुळे शेतकरी दादांचे प्रचंड हाल हाल झाले आहेत.राज्य शासन व केंद्र शासन मूग गिळून गप्प बसले आहेत व शेतकऱ्यांकडे जानिवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. तेव्हा मायबाप सरकारने असे न करता शेतकऱ्यांच्या व्यथा लक्षात घेऊन त्यांना काहीतरी अर्थिक मदत करावी. म्हणजेच शेतकरी सुखावतील.तेव्हा जाता जाता शेतकरी दादांनाही सांगू शकतो की,दादांनो आपल्यावर आलेल्या संकटावर हिंमतीने मात करायला शिका व आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत बसू नका. कर्जबाजारी झालात तरी चालेल पण डगमगू नका. प्रत्येक साल सारखे नसते. पाऊस पडेल व परिस्थिती बदलेल आणि आज ना उद्या आपण कर्जमुक्त व्हाल. फक्त गरज आहे ती आपल्याला धीर ठेवण्याची व आलेल्या संकटाला हिंमतीने तोंड देण्याची.

# नवीन मतदारांनी मतदार यादीत नाव नोंदणी करावी

आधुनिक केसरी न्यूज



**रिसोड :** शहरातील 18 वर्ष पुर्ण झालेल्या नवीन मतदारांनी आपली नावे मतदार यादीत नोंदणी करुन घ्यावेत. त्यासाठी दि.2 डिसेंबर आज नगर परिषद व तहसील कार्यालय येथे नाव नोंदणी होणार आहे असून, जास्तीत जास्त नवीन मतदारांनी आपली नावे मतदार यादीत समाविष्ट करुन घ्यावेत. असे आवाहन नगर सेविका सौ. मिरा संतोष चऱ्हाटे यांनी केले आहे. रिसोड शहरातील नागरिकांना कळविण्यात येते की,तहसिल कार्यालय रिसोड व नगर परिषद रिसोड यांचे संयुक्त विदयमाने शनिवार दिनांक 2 डिसेंबर 2023 सकाळी 11 वाजतापासून दुपारी 4 वाजेपर्यंत नगर परिषद रिसोड येथे रिसोड शहरातील 18 वर्षावरील नागरींकासाठी नविन मतदार नोंदणी,मतदार यादीतील नांव दुरूस्ती,नांव कमी करणे,फोटो मधील दुरूस्ती इत्यादी कामांकरीता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे तरी जास्तीत जास्त 18 वर्ष पुर्ण झालेआपण आपल्या कुटुंबातील,नातेवाईक,मीत्र,परीचयातील नागरीकांना कळवून मतदान यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यात यावे. आणि येना-या निवडणुकी मध्ये मतदानाचा हक्क बजवावा. मतदान करने हा आपला जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो आपण बजवायलाच पाहिजे. असे देखिल मिरा चऱ्हाटे यांनी म्हटले आहे.

# राज्यस्तरीय निर्भीड, उत्कृष्ट पत्रकार सेवा गौरव पुरस्काराने फिरोज शेख यांचा गौरव

## राज्यस्तरीय ज्ञानपंख गौरव पुरस्कार सोहळा थाटात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** येथे नुकतेच पार पडलेल्या समता ग्रामीण विकास प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गौरव पुरस्कार सोहळा थाटामाटात संपन्न झाला आहे समता ग्रामीण विकास प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र यांनी आयोजित केलेल्या गौरव पुरस्कार सोहळ्यात राज्यभरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. औरंगाबाद येथील युद्ध भूमी तथा विराट औरंगाबाद वृत्तपत्राचे संपादक फिरोज शेख यांना ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र यांच्या वतीने पत्रकारिता



क्षेत्रातील राज्यस्तरीय निर्भिड उत्कृष्ट पत्रकार सेवा गौरव पुरस्कार देऊन फिरोज शेख यांना गौरविण्यात आले आहे. अध्यक्ष तथा मुख्य संपादक दशरथ सुरडकर, उपसंपादिका जयश्री सोनवणे, कार्यकारी संपादक प्रविण तायडेसह संपादक संजय दांडगे यांनी, संपादक तथा केंद्रीय पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष फिरोज शेख (क्राईम रिपोर्टर) यांना राज्यस्तरीय निर्भीड पत्रकार सेवा गौरव पुरस्काराने सिल्लोड येथे दिग्गज मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले फिरोज शेख यांचे निर्भीड रोखठोक पत्रकारीता, सामाजिक शैक्षणिक, क्षेत्रातील कार्याची दखल घेत हे त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांचे सर्व संपादक.पत्रकार, मित्र मंडळी आदींसह सर्वच क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# लोणार येथील ग्रामीण रुग्णालय ऑक्सिजनवर

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** येथील ग्रामीण रुग्णालय ऑक्सिजनवर अशी प्रतिक्रिया शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी तेथील कारभार पाहून दिली. 30 नोव्हेंबर रोजी ग्रामीण रुग्णालयात सतरा परिवार नियोजनाचे शस्त्रक्रिये करिता शिबिर घेण्यात आले. परंतु त्यापैकी पाचच शस्त्रक्रिया झाल्या व एका एका शस्त्रक्रियेला तास दोन दोन तास लागले व पाच पैकी दोन शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्या म्हणजेच 40% शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या याला जबाबदार कोण शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्या रुग्णांना गरजेचा असलेला औषध साठा नाही त्यांची शस्त्रक्रिया करत असताना जी भूल दिली जाते ती भूल सुद्धा व्यवस्थित दिली गेली नाही. शस्त्रक्रियेच्या वेळेस पेशंट ओरडत होते त्रासाने विव्हळत होते त्यांचे हातात आणि तोंड दाबून शस्त्रक्रिया करण्यात आली हे चूक आहे. शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यावर कार्यवाही व्हावी करिता जिल्हाशल्य चिकित्सक चव्हाण यांच्याकडे तक्रार करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर येथील रुग्णालयात जे तेरा पद रिक्त आहेत ते त्वरित भरण्यात यावे अशीही मागणी करण्यात आलेली आहे. याप्रसंगी डॉ.गोपाल बछिरे यांच्यासह ॲड दीपक मापारी तालुकाप्रमुख,कैलाश अंभोरे तालुका संघटक, राजू बुधवंत विभाग प्रमुख, अमोल चव्हाण, संजय राठोड, विजय चव्हाण, कैलास जाधव, रामदास चव्हाण, संतोष सुभेदार, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व रुग्णांची नातेवाईक हजर होते.

# चंद्रपूर शहरातील बायपास रस्ता तातडीने करा : दिनेश चोखारे

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** हे एक प्रमुख औद्योगिक शहर आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडून पडली आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बायपास काढण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, प्रकल्प अद्यापही प्रलंबित आहे. बायपास रस्ता झाल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होणार होती. हा प्रश्न निकाली काढण्यात यावा. या मागणीसाठी भूमिपुत्र संघटनेचे संयोजक दिनेश दादापाटील चोखारे यांच्या नेतृत्वाखाली 1 डिसेंबर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. चंद्रपूर शहराच्या मध्यभागातून राष्ट्रीय महामार्ग जातो. या महामार्गावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. यामुळे शहराच्या मध्यभागी वाहतूक कोंडी होत असते. या कोंडीमुळे वाहनचालकांना अनेक तास थांबावे लागतात. यामुळे नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास होत आहे. जडवाहतूक शहरातून होत असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे अनेकांचा जीव सुद्धा गमावला गेला आहे. अनेकांना दुखापत सुद्धा झाली आहे. ही रहदारी बायपास मार्गे झाल्यास शहरातून वाहतूक करताना इतरांना अडचण जाणार नाही. चंद्रपूर शहराच्या बाहेरून बायपास काढण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, अद्यापही या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झालेली नाही. बायपास रस्ता झाल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही. तसेच, शहराची वाहतूक व्यवस्था सुव्यवस्थित होईल. चंद्रपूर शहराच्या बायपास प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्यासंदर्भात आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी या धरणे आंदोलनातून करण्यात आली. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती विजय बल्की, बाजार समितीचे संचालक अजय बलकी, पंचायत समिती चे माजी सभापती रोशन पाचारे, ओबिसी नेते सचिन राजुरकर, बल्लारपूर तालुका अध्यक्ष गोविंदा उपरे, हासिम कासिम खान, साखरवाहीचे सरपच नागेश बोंडे,सुरज तोतडे सरपंच ,पांढरकवडा, प्रेमानंद जोगी, आदिवासी नेते कृष्णाजी मासराम, पंचायत समिती माजी उपसभापती मनोज आत्राम,पांढरकवडा सरपंच सुरज तोतडे, बाजार समितीचे संचालक गणेश आवारी, पवन अगदारी, भटालीचे सरपंच किसन उपरे,माजी उपसरपंच संजय टिपले , रंगराव पवार, धनंजय राजुरकर, राहुल शेंडे, ईश्वर आखरे, हितेश लोंढे, गोविंदा बल्की, साचीन शेरकी, रोशन रामटेके, विवेक खुटेमाटे, नंदू टाँगे, जगन्नाथ चटप, जावेद कुरेशी, राजू कांबळे, निळकंठराव बल्की, सिद्धार्थ कवाडे, लक्ष्मण मांढरे, अझहर खान, आदिसह शेकडो भूमिपुत्र उपस्थीत होते.धरणे आंदोलनात बोलताना दिनेश दादापाटील चोखारे म्हणाले, "चंद्रपूर शहरातील वाहतूक कोंडी हा एक गंभीर प्रश्न आहे. या प्रश्नाचे तातडीने निराकरण करणे आवश्यक आहे. बायपास रस्ता झाल्यास हा प्रश्न निकाली लागेल. त्यामुळे बायपास प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करावी. अशी मागणी करत मागण्या पुर्ण न झाल्यास 15 जानेवारी 2024 रोजी उपोषण करण्याचा इशारा यावेळी दिला आहे. यावेळी उपस्थित नेत्यांनीही बायपास प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली.



# टाके घोटी ग्रामपंचायत उपसरपंचपदी संगिता मदन लहाने यांची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील संवेदनशील समजल्या जाणाऱ्या टाके घोटी ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदाची निवडणुक टाके घोटी ग्रामपंचायत कार्यालयात सर्व सदस्यांच्या उपस्थितीत पार पडली. उपसरपंच पदासाठी संगिता मदन लहाने यांचा विहित वेळेत एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संगिता लहाने यांची निवड अविरोध घोषित केली. निवडणुक अध्यासी अधिकारी म्हणून सरपंच माधुरी आडोळे यांनी काम पाहिले तर सचिव म्हणून ग्रामसेवक चेतन पवार यांनी काम पहिले तर निरीक्षक म्हणून संजय पाटील यांनी काम पहिले. यावेळी सभागृहात सदस्य पूजा मनोज भगत, प्रदीप तुकाराम दालभगत, कल्पना मछिंद्र दोंदे, कार्तिक विष्णू आडोळे यांनी बिनविरोध निवडीसाठी परिश्रम घेतले. उपसरपंच संगिता लहाने यांच्या निवडीचे अभिनंदन सभापती ज्ञानेश्वर लहाने, रघुनाथ तोकडे, भगवान भोर, दशरथ अडोळे, माजी सरपंच भागीरथ भोर, अर्जुन आडोळे, मछिंद्र दोंदे, माजी सरपंच धर्मराज आडोळे, ज्ञानेश्वर आडोळे, हेमंत लहाने, गोरख दुभाषे, केशव लहाने, उत्तम लहाने, सुरेश लहाने, चंद्रकांत भगत, जनार्दन भगत, हरिश्चंद्र लायरे, ज्ञानेश्वर आडोळे, राजू लहाने, गोविंद गतीर, अमित लहाणे, अंकुश तोकडे, जनक लहाने, नामदेव लहाने, गणेश तातळे,आदी ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# नागोसलीच्या उपसरपंचपदी अशोक शिंदे यांची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील नागोसली ग्रामपंचायत उपसरपंच पदाची निवडणूक नुकतीच पार पडली असून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ही निवडणूक पार पडली. विशेष म्हणजे तरुण चेहरा या ग्रामपंचायतवर दिल्याने परिसरातून कौतुक होत आहे. उपसरपंच पदासाठी अशोक दत्तू शिंदे यांचा एकमेव अर्ज विहित वेळेत आल्याने निवडणूक अध्यासी अधिकारी सरपंच काशिनाथ होले यांनी उपसरपंच पद घोषित केले. निवडणुकीत सचिव म्हणून संभाजी मारकंडे यांनी काम पाहिले. दरम्यान यावेळी ग्रामपंचायत सभागृहात सुरेश आनंदा धापटे, सुमनबाई लक्ष्मण मुतडक, कणिता संजय होले हे सदस्य यावेळी उपस्थित होते.

या निवडीचे अभिनंदन समाजसेवक प्रमोद मोजाड, बाजीराव जाधव, गणपत शेलार, माजी ग्रामपंचायत सदस्य रोहिणी शेलार, दत्तू पा शिंदे, श्याम शिंदे, गजीराम जोंधळे, देवराम शिंदे, सुखा होले, तानाजी शेलार, ढवळू होले, ज्ञानेश्वर जोंधळे, ज्ञानेश्वर शेलार, शामभाऊ शिंदे, लक्ष्मण शिंदे, निवृती शिंदे, कैलास ताठे, बाळू ताठे, गजीराम जोंधळे, पंढरी होले, आनंदा धापटे, राजू खामकर, चंदर गिरे, मनाजी खोडके, बाळू डोळस, आकाश गरुड, चिवा सप्रे, वसंत बोराडे आदींनी या निवडीचे अभिनंदन केले.



# राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेच्या लाभार्थ्यांना एकरकमी अर्थसहाय्य

## चंद्रपूर जिल्ह्यातील कुटुंबियांसाठी सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला यश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दारिद्र्य रेषेखालील कुटुंबीयांना केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या एक रक्कमी अर्थसाहाय्याकरिता चंद्रपूर जिल्ह्याला एक कोटी 19 लक्ष 80 हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा करून या गरीब व गरजू कुटुंबांसाठी शासनाकडे पत्रव्यवहार केला होता. या संदर्भात शासनादेश नुकताच निर्गमित झाला आहे.

राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागाच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या यादीत नोंद असलेला कर्ता पुरुष किंवा स्त्री मरण पावल्यास कुटुंबीयांना एक रकमी रुपये 20,000 रुपये अर्थसहाय्य केले जाते. चंद्रपूर जिल्ह्यातील 689 कुटुंबीयांचे एप्रिल 2022 पासूनचे राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना अंतर्गत चे प्रस्ताव निधी अभावी प्रलंबित असल्याचे पत्र पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी 30 ऑक्टोबर 2023 रोजी मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे यांना देऊन हा निधी तातडीने वितरित करण्याची विनंती केली होती. यासंदर्भात ना. मुनगंटीवार यांच्या कार्यालयातून सतत पाठपुरावा केल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यासाठी एक कोटी 19 लक्ष 80 हजार रुपये निधीची तरतूद करण्यात आली. सदर निधी उपलब्धतेच्या निर्णयामुळे प्रलंबित असलेल्या 689 कुटुंबीयांपैकी प्राथमिकतेनुसार बहुतांश कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. उर्वरित नीधीबद्दल देखील संबंधितांची सातत्याने पाठपुरावा करून जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबीयांना आधार देण्यासाठी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे. सदर निधीची रक्कम ही जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वळती करण्यात आली असून त्यांच्यामार्फत लाभार्थींना कळवून वितरित करण्यात येणार आहे.

देशातील गरीब, वंचितांच्या सेवेसाठी व त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी विश्वगौरव माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार कटिबद्ध असून गरिबांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासन देखील केंद्राच्या सर्व योजना गरिबांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेत असल्याचे ना. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.




# उजेडगामी मानवतेचा ध्यास घेतलेली कविता

## डॉ.अशोक इंगळे : 'स्वातंत्र्या तुझं गाव कुठाय?' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** रमाई धम्मसृष्टी स्मारक समिती व बोधीपर्ण प्रकाशन , छत्रपती संभाजी नगर च्या वतीने स्वातंत्र्या तुझं गाव कुठाय ? या काव्यसंग्रहाचे प्रकाशन आणि राजरत्न उत्कृष्ट वांडमय पुरस्कार वितरण सोहळा नुकताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाला. स्वातंत्र्या तुझं गाव कुठाय? या बोलक्या शीर्षकातून भेडसावत असलेला मूलभूत प्रश्न हा केवळ कवी पुरता सीमित नाही तर , समग्र वंचित, उपेक्षित समूहाचा तो प्रश्न आहे. म्हणून ही कविता उजेडगामी मानवतेचा ध्यास घेतलेली कविता आहे. अश्या शब्दांत कवी डॉ.अशोक इंगळे यांनी स्वातंत्र्या तुझं गाव कुठाय ? या कवितासंग्रहाच्या प्रकाशनानिमित्ताने ते बोलत होते. डॉ. भास्कर पाटील, डॉ.रेखा मेश्राम, यांच्या हस्ते या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ चे राज्य महासचिव प्रा.देवानंद वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा झाला. या वेळी जेष्ठ कवी शेषराव धांडे, डॉ. रेखा मेश्राम, डॉ.अशोक इंगळे, डॉ.भास्कर पाटील, डॉ. कैलास वानखेडे, प्रकाशक देवानंद पवार उपस्थित होते. बोधीपर्ण प्रकाशन च्या या सोहळ्याला विविध क्षेत्रातील शहरवासीयांनी मोठी उपस्थिती लावली होती. ही कविता विद्रोहाची नसून भावगीत कविते सारखी सरळ साधी कविता असल्याचे मनोगत प्रा.अनिल दंडाळे म्हणाले. देवानंद पवार यांनी प्रास्ताविक व पंकज शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर आभार ॲड.सुनिल शेल्हारकर यांनी मानले.

# तहसीलदार विनापरवाना क्रेशर मशिनवर कार्यवाही करतील

## प्रदूषणामुळे आरोग्य धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** तालुक्यातील मारतळा, येळी, कौडगाव, हातणी, वाका व परिसरात असलेल्या विनापरवाना क्रेशर मिशनच्या प्रदुषणामुळे मारतळ्यासह परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या प्रदुषणामुळे श्वसनास स्त्रास, लहान बालकांच्या आरोग्यावर परिणाम, यासह अनेक वेगवेगळे आजार होऊ लागले आहेत. गिट्टी क्रेशरवाले प्रदुषण प्रतिबंधात्मक नियमांचे राजरोषपणे उल्लंघन करत आहेत. पण प्रदूषण नियंत्रण मंडळ व स्थानिक महसूल मंडळ यांच्याशी आर्थिक तडजोड करुन अवैध गिट्टी क्रेशर चालवत आहेत. गिट्टी क्रेशर परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पिकावर धुळ बसून कापूस, ज्वारी, सोयाबीन खराब होत असल्याच्यी चर्चा आहे. गिट्टी क्रेशर परिसरातील अनेक ठिकाणी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन केली नसल्याची गंभीर बाब दिसून येत आहे. तर काही ठिकाणी तुरळक प्रमाणात वृक्ष दिसत आहेत. यामुळे मारतळा परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अशी चर्चा लोहा तालुक्यात आहे. या भागातील प्रदूषण रोखण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने गिट्टी क्रशरवर तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

हातनी, कौडगाव, वाका, डेरला परिसरात विनापरवाना क्रेशर मशीन जोरात सुरू असून नियमबाह्य दगडाच्या खदानीतुन दगडाचे उतखनन केले जात आहे.

खदानी किती खोल असावी याचा नियम पायदळी तुडवली जात आहे. खदानी साठी दिलेले शेतकऱ्यांनी सातबारा सर्वे नंबर हा वेगळा असून त्यानाअड इतर ठिकाणी दगडाचे उतखनन केल्या जात आहे. या गंभीर बाबीकडे तलाठी, मंडळ अधिकारी डोळेझाक करून आपली आर्थिक खळगी भरत असल्याची चर्चा सुरू आहे.अनेक क्रेशर मशीन ला त्या त्या परिसरातील ग्रामपंचायत चा परवाना नाही. हातनी येथील एक क्रेशरमशीन तर चक्क गायरान पट्यात असल्याचे चर्चा सुरू आहे. या अवैद्य क्रेशर मशनी मुळे परिसरात धूळ ध्वनी प्रदूषण होत आहे धुळीमुळे अनेक शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान झाले आहे तर आरोग्यावर ही या धुळीचा परिणाम होऊन नागरिक बिमार होत आहेत याकडे नूतन तहसीलदार लक्ष देऊन कार्यवाही करतील का असा प्रश्न जनतेत उपस्थित केला जात आहे.



# धनगर बांधवांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** शहरात दि 29रोजी शहरांमध्ये धनगर समाज बांधवांचा अतिशय शिस्तप्रिय असा भव्यदिव्य मोर्चा धाराशिव वासियांनी अनुभवला. धनगर समाज बांधव पिवळे झेंडे, महिला व पुरुषांनी परिधान केलेल्या पिवळ्या टोप्या,भंडाऱ्याची उधळण करत एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी धनगर समाजाच्या वतीने गुरूवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेळ्या मेंढ्या सह विराट मोर्चा काढण्यात आला. सर्वत्र पिवळे फेटे व पारंपरिक वेशात असलेले समाज बांधव दिसत असल्यामुळे शहर पिवळंमय दिसत होते. स्वतः जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी मोर्चामध्ये येऊन निवेदन स्विकारले. दरम्यान, मोर्चात हजारोंच्या संख्येने धनगर समाज बांधव त्यासोबत महिला उपस्थित होत्या. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळालेच पाहिजे, झोपलेल्या राज्यकर्त्यांनो जागे व्हा, अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील परिसर दुमदुमला होता. शहरातील धनगर बांधवांनी स्वयंस्फूर्तीने पाणी, वडापाव, राईस आदी अल्पोपहार सोय करण्यात आली होती.

# ६ डिसेंबर रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे रंगणार 'कपट्यम' नाटक

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय तर्फे आयोजित ६२ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२३-२४ डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह ठाणे येथे मंगळवार २८ नोव्हेबर २०२३ ते ०४ जानेवारी २०२४ दरम्यान मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या स्पर्धेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण ५८० संघाचा सहभाग असून ठाणे, पालघर, रायगड जिल्हयातील संघही या स्पर्धेत सहभागी आहेत. रायगड जिल्हयातून उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील श्री जरी मरीआई नवरात्रौत्सव मंडळ भेंडखळ प्रस्तूत, फ्रेंड्स सामाजिक कलामंच भेंडखळ आयोजित मराठी दोन अंकी रहस्यमय नाटक 'कपट्यम' चा देखील समावेश आहे. बुधवार दि. ६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी १२:३० वाजता हे दोन अंकी कपट्यम नाटक सादर होणार आहे. मराठी दोन अंकी रहस्यमय 'कपट्यम' या नाटकाचे लेखक किरण अनंत घरत असून दिग्दर्शक चंद्रविलास घरत यांनी केले आहे. नेपथ्य दत्ता भोईर, प्रकाश योजना कौशिक भोईर, संगीत अक्षय भोईर, रंगभूषा, वेशभुषा अमृत म्हात्रे, वृत्तनिवेदन दर्शना माळी, तसेच सूत्रधार जन्मेंजय भोईर हे असतील. सदर नाटकात रेखा ठाकूर, निकिता पाटील, संकेत ठाकूर,राजेश ठाकूर, भावेश ठाकूर, कौशिक म्हात्रे, उमंग भोईर, चंद्रविलास घरत आणि किरण घरत आदी कलाकार आपली भूमिका या नाटकात सादर करणार आहेत. सदर नाटक पाहण्यासाठी रसिक प्रेक्षकांनी जास्तीत जास्त मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# तहसील कार्यालयात तरुणाचा जाळून घेण्याचा प्रयत्न

## एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी धनगर समाजाच्या तरुणाने उचलले पाऊल

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील तहसील कार्यालयाच्या आवारात धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात त्वरित समावेश करण्यात यावा व त्याची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी करत एका तरुणाने अंगावर डिझेल ओतून जाळून घेण्याचा प्रयत्न केला सदर युवकाला त्वरित ताब्यात घेऊन तहसील कार्यालयाने जामिनावर सुटका केली. मंगेश गुंजाळ असे डिझेल अंगावर ओतून जाळून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. यापूर्वी मंगेश गुंजाळ यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले होते या निवेदनात महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर धनगर समाजाच्या रळ आरक्षणाची अमलबजावणी त्वरित करण्यात यावी म्हणजे सकल धनगर समाज आरक्षणाच्या सुविधा अनेक वर्षापासून वंचित आहे त्यांना त्याचा लाभ मिळेल. या सर्व लाभासाठी सकल धनगर समाजाच्या वतीने कोकणवाडी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर येथे उपोषणकर्ते रंगनाथ राठोड, हरिचंद्र वैद्य, संपत रोडगे यांचे रविवार दि. १९ रोजी पासून आमरण उपोषण सुरु आहे. परंतु सरकारने अद्याप कोणतेही प्रकारची दखल घेतली नाही. याची लवकरात लवकर दाखल घेण्यात यावी दखल नाही घेतल्यास आपल्या कार्यालयासमोर लोकशाहीमार्गाने आंदोलन केले जाईल असे निवेदन दिले होते. या निवेदनावर मंगेश गुंजाळ, एकनाथ ढेपले किरण वाघ आदिच्या स्वाक्षऱ्या आहे. त्याअनुषंगाने त्याने मंगळवारी सकाळी तहसील कार्यालयाच्या आवारात येऊन अंगावर डिझेल ओतून जाळून घेण्याचा प्रयत्न केला त्या सुरक्षा रक्षकानी पकडून पोलीसांच्या स्वाधीन केले.

# धम्म संस्कारांतून बौद्ध संस्कृतीची रुजवात

## प्रशांत गवळे : विश्वशांती बुद्ध विहारात कार्तिक पौर्णिमा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड:** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ साली स्वतः बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन लाखो अनुयायांना दीक्षा दिली. भारतात या क्रांतिकारी घटनेने बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन झाले. बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्याची जबाबदारी भिक्षूंसह उपासक उपासिकांची आहे. बालकांवर सुयोग्य धम्मसंस्कार झाल्यास बौद्ध संस्कृतीची रुजुवात होईल असा आशावाद येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संशोधक विद्यार्थी प्रशांत गवळे यांनी व्यक्त केला. ते कार्तिक पौर्णिमेनिमित्त जवळा देशमुख येथील विश्वशांती बुद्ध विहारात आयोजित पौर्णिमोत्सव कार्यक्रमात ते धम्मसंस्कार आणि बौद्ध संस्कृती या विषयावर बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे, मुगट ग्राम पंचायत सदस्य देवदत्त हटकर, माजी सैनिक श्रावण गोडबोले, माजी सरपंच कैलास गोडबोले, सखाराम गोडबोले, आनंदा गोडबोले, भैय्यासाहेब गोडबोले, सूरज गोडबोले, सुरेश गोडबोले यांची उपस्थिती होती.

**सामाजिक प्रदुषण पसरविणे थांबवावे :** विविध जाती जमाती आणि धार्मिकतेवरुन बेताल वक्तव्य करणे तसेच सोशल मीडियावर आक्षेपार्ह लिखाण करुन सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचे प्रयत्न होत आहेत. यासाठी छोट्यामोठ्या घटना कारणीभूत ठरत आहेत. असामाजिक तत्वांना कोणत्याही परिस्थितीत थारा देऊ नये असे आवाहन व्याख्याते प्रशांत गवळे यांनी केले. कोणत्याही संघटनेच्या तसेच राजकीय पक्षाच्या नेतृत्वाने भडकाऊ भाषणे करुन होत असलेले सामाजिक प्रदुषण पसरविणे थांबवावे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे दीप धूप आणि पुष्प पूजन करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर सामुदायिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले. तसेच त्रिरत्न वंदना आणि आशिर्वाद गाथा घेण्यात आली. गोडबोले परिवाराकडून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना ते म्हणाले की, महिला व युवकांनी राजकारणात आले पाहिजे. हे राजकारण प्रबुद्ध भारताच्या निर्मितीसाठी आवश्यक आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी राजकीय आंबेडकरी चळवळीला हातभार लावला पाहिजे असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भैय्यासाहेब गोडबोले यांनी केले. सूत्रसंचालन आनंद गोडबोले यांनी तर आभार माजी सैनिक तथा आयोजक श्रावण गोडबोले यांनी मानले. कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात सखाराम गोडबोले यांच्या परिवाराकडून उपस्थितांना भोजनदान देण्यात आले. शेवटी सरणत्तय घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. यशस्वीतेसाठी हिरकणबाई गोडबोले, सखाराम गोडबोले, सुमनबाई गोडबोले, तुकाराम गोडबोले, रमाबाई गोडबोले, भीमराव गोडबोले, वर्षा गोडबोले, विशाखा गोडबोले, धम्मपाल गोडबोले, संगिता पुण्यजित ढगे, संतोष वाळवंटे, सुनिता गच्चे, शिवाजी गच्चे, केशव अतूल गच्चे, रवी गच्चे, गुणवंत गच्चे, रमेश गोडबोले, अशोक गोडबोले, करुणाबाई गच्चे, वसंत गोडबोले आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला परिसरातील बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# पुणे-नाशिक महामार्गावर अपघातात तिघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुणे-नाशिक महामार्गावर ट्रकला जीपने धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला. अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले असून त्यांचावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शुक्रवारी पहाटे पाचच्या सुमारास मंचरजवळ अपघात झाला. दाट धुक्यामुळे जीपचालकला अंदाज न आल्याने जीपने पाठीमागून ट्रकला धडक दिली.

सटाणा तालुक्यातील सायखेडा येथून पुण्याकडे निघालेल्या जीपने पाहाटे पाचच्या सुमारास ट्रकला मागून धडक दिली. दाट धुक्यामुळे जीपचालकाला अंदाज आला नाही. जीप चालक पंकज खंडु जगताप (वय ३६), मधुकर तुकाराम अहिरे (वय ५२), शांताराम संभाजी अहिरे (वय ५० सर्व रा. सायखेडा, ता. सटाणा, जि. नाशिकः) यांचा मृत्यू झाला. जखमींना मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार राजेंद्र हिले आणि पोलीस शिपाई मोमीन यांनी घटनास्थळी धाव घेतली. तातडीने मदतकार्य सूरू केले. वाहनांना रस्ता मोकळा करुन दिला. दाट धुके असल्याने अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# हँडबॉल स्पर्धेत लोणंदच्या महाविद्यालयाचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या वतीने यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर येथे अंतरविभागीय महिला हँडबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेतून लोणंद येथील रयत शिक्षण संस्थेच्या शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या महिला संघाने तृतीय क्रमांक मिळवला.विद्यालयातील महिला हँडबॉल पहिल्या सामन्यात एम. बी. एस. के. कडेगाव या संघाच्या विरुद्ध २०-०२ या फरकाने विजय संपादन केला होता. त्यानंतर कन्या महाविद्यालय मिरज या संघा विरुद्ध २५-५ अशा फरकाने विजय मिळवून महाविद्यालयाच्या महिला हँडबॉल संघाने या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक संपादित केला आहे. या संघात महाविद्यालयातील रितू भरत क्षीरसागर, प्रियांका राहुल धायगुडे, ऋतिका भरत मासाळ, नयन दत्तात्रय साठे, प्रतिक्षा केशव शिरवले, निकिता महादेव आवटे, प्रतिक्षा वसंत धायगुडे, सानिका मिलिंद सपकाळ, सायली बजरंग रासकर, प्रतिक्षा राजेंद्र वाडेकर, शुभांगी बाळू खांडेकर यांनी सहभाग घेतला होता.या संघाला महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा.संकेत नालकर,सातारा जिल्हा हावशी हँडबॉल असोशियशनचे सचिव सयाजी तिरमिखे, अजित कदम, विजय चव्हाण यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यामुळे संघाने मोठे यश संपादन केले.या यशाबद्दल महाविद्यालय विकास समिती सदस्य प्र.प्राचार्य,उपप्राचार्य,शिक्षक,शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.



# सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे कॅन्सर हॉस्पिटलच्या कामाला गती

## कॅन्सर पीडितांना मिळणार दिलासा : सहा महिन्यांत हॉस्पिटल येणार लोकांच्या सेवेत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** गेल्या अडीच वर्षांपासून रखडलेल्या चंद्रपूर कॅन्सर केअर हॉस्पीटलच्या कामाला राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे गती मिळाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कॅन्सर पीडितांना मोठा दिलासा मिळाला आहे. ऑक्टोबर 2022 पर्यंत या हॉस्पीटलचे केवळ 30 टक्के काम झाले होते. मात्र गेल्या एक वर्षात पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हॉस्पिटलच्या उभारणीकरिता घेतलेल्या नियमित बैठका आणि, शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे आता हॉस्पीटलचे 87 टक्के काम पूर्ण झाले आहे. येत्या सहा महिन्यांमध्ये कॅन्सर हॉस्पिटल लोकांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मुंबईवरून दूरदृष्यप्रणालीद्वारे वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, तर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विनय



गौडा, जी.सी. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, टाटा कॅन्सर हॉस्पीटलचे डॉ. कैलाश शर्मा व त्यांची टीम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद फुलपाटील, सहाय्यक अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे यांची उपस्थिती होती. चंद्रपूर येथे कॅन्सर हॉस्पीटलच्या निर्मितीसाठी चंद्रपूर कॅन्सर केअर फाऊंडेशनची स्थापन करण्यात आली आहे, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, '27 जून 2019 ला या हॉस्पीटलच्या बांधकामाचे वर्कऑर्डर देण्यात आले. मात्र अडीच वर्षे या रुग्णालयाचे काम पूर्णपणे थंडबस्त्यात पडले. गेल्या वर्षीपासून या कामाला गती देण्यात

**आरोग्य तपासणीच्या माध्यमातून होणार कॅन्सरचे निदान :** मोठ्या प्रमाणात कॅन्सर रुग्णांची वाढ ही अतिशय गंभीर बाब आहे. जिल्ह्यातील प्रदुषण हा सुध्दा एक घटक त्यासाठी कारणीभूत राहू शकतो. तसेच ब्रेस्ट कॅन्सर, मुखाचा कॅन्सर, गर्भाशय आणि गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर आदी प्रकार आज मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांची तपासणी करून कॅन्सरचे निदान करण्यासाठी टाटा ट्रस्टच्या वतीने फिरत्या बसच्या माध्यमातून रुग्ण शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.

**सुसज्ज व अत्याधुनिक उपकरणांसह निर्मिती :** चंद्रपूर येथे 2 लक्ष 35 हजार चौरस फूट जागेवर 140 खाटांचे चंद्रपूर कॅन्सर केअर हॉस्पीटलचे बांधकाम होत असून हॉस्पिटलची मुख्य इमारत ग्राऊंड फ्लोअर अधिक चार मजले, रेडीएशन ब्लॉक ग्राऊंड फ्लोअर अधिक एक मजला, युटीलिटी ब्लॉक ग्राऊंड फ्लोअर अधिक एक मजला अशी राहणार आहे. याशिवाय रेडीएशन, किमोथेरपीकरीता अत्याधुनिक उपकरणांची उपलब्धता करण्यात येणार आहे. त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर्स, प्रशिक्षित मनुष्यबळ आदी बाबींची पूर्तता करण्यात येणार आहे.

आली असून एका वर्षात 30 टक्क्यांवरील बांधकाम आज 87 टक्क्यांपर्यंत पोहचले आहे. कॅन्सर हे हॉस्पीटल येत्या सहा महिन्यात सुसज्ज इमारत आणि अत्याधुनिक उपकरणांसह सज्ज होऊन कॅन्सर पीडितांना उपचाराकरीता उपलब्ध करावा अश्या सूचना ना. मुनगंटीवार यांनी दिल्या,' यावेळी कॅन्सर फाऊंडेशनच्या संचालकांनी कॅन्सर हॉस्पिटल येत्या सहा महिन्यात सुरू करण्याचे आश्वासन दिले.

'हॉस्पिटलच्या गुणवत्तेत तडजोड नको'

कॅन्सर हॉस्पीटलचे बांधकाम, उपकरणांची उपलब्धता, आवश्यक मनुष्यबळ, त्यांचे वेतन आदींसाठी गॅप फंडींगचा विषय तात्काळ मार्गी लावा. तसेच हॉस्पीटलच्या गुणवत्तेमध्ये कुठलीही तडजोड करू नये. याबाबत जिल्हाधिकारी यांनी दर पंधरा दिवसांत कामाचा आढावा घ्यावा. जिल्ह्यातील कॅन्सर पीडित रुग्णांना दिलासा देण्यासाठी या कामात आता प्राधान्याने पुढे जाण्याचे निर्देश पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिले.

# जरांगेंची अकोला चरणगावमध्ये सभा

## पश्चिम विदर्भात ४ व ५ डिसेंबरला दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** मराठा समाजाला आरक्षण मिळवून



देण्यासाठी पाठपुरावा करणारे मनोज जरांगे पाटील यांची अकोला जिल्ह्यातील चरणगाव येथे ५ डिसेंबरला सकाळी ११ वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. १५० एकरवर त्यांच्या सभेचे नियोजन करण्यात आले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी आंदोलन छेडणारे मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित करून सरकारला निर्णय घेण्यासाठी वेळ दिला. त्यानंतर राज्यभरात दौरा प्रारंभ केला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या विविध जिल्ह्यांमध्ये त्यांचे दौरे सुरू आहेत. मनोज जरांगे पाटील यांचा 'समाज बांधव गाठी-भेटी दौरा' सध्या तीन टप्प्यांमध्ये सुरू आहे. या दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात मनोज जरांगे पाटील ४ डिसेंबरला मुक्ताईनगर, मलकापूर, खामगाव येथे समाज बांधवांच्या भेटीगाठी घेऊन सायंकाळी शेगाव येथे मुक्काम करतील. त्यानंतर ५ डिसेंबरला अकोला जिल्ह्याच्या पातूर तालुक्यातील चरणगाव येथे त्यांची जाहीर सभा होणार आहे. याच दिवशी वाशीम आणि हिंगोली येथेही त्यांची उपस्थिती राहील. सकल मराठा समाजाच्यावतीने चरणगावात मनोज जरांगे पाटील यांच्या सभेची तयारी सुरू आहे. १५० एकरवर ही सभा होणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.



# अवकाळीचे पंचनामे त्वरित करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाच्या वतीने आज रणजीत राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना भेटून जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करून त्वरीत नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी कण्यात आली.

धुळे जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून अवकाळी व अमोसमी मोठ्या प्रमाणात पाऊस पडलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. संपूर्ण पिकांचे नुकसान होऊन शेतकरी हतबल झालेले आहेत. परंतु अद्यापही जिल्ह्यामध्ये पंचनामे झालेले नाही.

तरी धुळे जिल्ह्यातील सर्वत्र शेतकऱ्यांचे त्वरित पंचनामे करण्यात यावे व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मागणी करण्यात येत आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्री. रणजीत राजे भोसले, सुभाष पाटील, राजू डोमले,डी टी पाटील, वसंत तावडे , डी जे मराठे, भीका नेरकर, अशोक धुळकर, डोमनिक मलबारी, मनोज कोळेकर, वैभव पाटील, प्रणव भोसले, शकीला बक्ष, अमित शेख, जयंत चान्सरकर, रईस काझी, यशवंत पाटील, छाया सोमवंशी, स्वामीनि पारखे, चेतना मोरे, जयश्री घेटे, भटू पाटील, नंदू येलमामे, भूषण गवळे, युसूफ शेख, अशोक गवळे, राजू मशाल, भाग्येश मोरे, मशुद अन्सारी, राहुल महाजन, जावेद. बेघ, नुरुद्दीन शहा, आकाश बैसाणे, सलमान खान, समदं शेख, रेखा घुले,कृष्णा ठाकरे, राजू सोनवणे,शामराव मोरे, जीवन चव्हाण, दीपक जाधव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## साप्ताहिक विशेष रेल्वेला मुदतवाढ

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** हैदराबाद-जयपूर साप्ताहिक विशेष रेल्वेला मुदतवाढ देण्यात आली आहे. या रेल्वेच्या आणखी प्रत्येकी नऊ फेऱ्या होणार आहेत. नांदेड, अकोला,



खंडवा, भोपाळ, उज्जैन, अजमेर मार्गे धावणारी हैदराबाद-जयपूर साप्ताहिक विशेष रेल्वेला प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मुदतवाढ देण्यात आली. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी साप्ताहिक विशेष रेल्वे सेवांचा कालावधी वाढवला आहे. गाडी क्रमांक ०७११५ हैदराबाद – जयपूर साप्ताहिक विशेष रेल्वेची सेवा १ डिसेंबरपासूनपासून २६ जानेवारीपर्यंत वाढविण्यात आली असून नऊ फेऱ्या हैद्राबाद येथून चालवण्यात येतील. रेल्वे गाडी क्रमांक ०७११६ जयपूर – हैदराबाद साप्ताहिक विशेष रेल्वेची सेवा ०३ डिसेंबरपासून ते २८ जानेवारीपर्यंत वाढविण्यात आली. या गाडीच्या नऊ फेऱ्या जयपूर येथून चालवण्यात येतील. रेल्वे फेऱ्यांचे वेळापत्रक आणि थांबे यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही.

## 'करिअर कट्टा' या उपक्रमाच्या फलकाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अॅन्ड कॉमर्स बोखारा, जिल्हा नागपूर येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या "करिअर कट्टा" या उपक्रमाच्या फलकाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते माता सरस्वती च्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले.

संगीत विभाग प्रा. देशमुख आणि प्रा. रोठे सर यांच्या माध्यमातून सरस्वती वंदना, स्वागत गीत आणि प्राथर्ना सादर करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव मा.डॉ.मारोती वाघ सर तर प्रमुख अतिथी म्हणुन रोजगार नोकरी संदर्भ चे संपादक प्रा. संजय नाथे, प्रमुख वक्ते कुलदीप सोनकुसरे, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ.अर्चना कहाळे - पत्की आणि पर्यवेक्षिका प्रा .कांचन तिवारी उपस्थित होते.त्याचबरोबर महाविद्यालयात स्थापन झालेल्या करियर संसदेच्या सदस्यांचे देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. करियर कट्टा हे उपक्रम विद्यार्थी, प्राध्यापक आणि महाविद्यालय यांच्या प्रती विकासाभिमुख ठरत आहे असे मत संस्थेचे सचिव डॉ.मारोती वाघ सर यांनी व्यक्त केले. त्याच बरोबर महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थांनी करियर कट्टा उपक्रमात सहभागी होऊन त्याचा लाभ घ्यावा असे देखील आवाहन केले, तर प्रा.संजय नाथे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना करियर कट्टा च्या माध्यमातून अतिशय अभिनव उपक्रम राबविले जातात आपण विद्यार्थ्यांनी त्याचा पुरेपूर फायदा करून घेत भविष्याची वाट चालत जावी,असे मत व्यक्त करीत करियर कट्टा संसदेस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रामाचे सूत्रसंचालन महाविद्यालयीन समन्यवयक प्रा.सायली लाखे - पिदळी यांनी केले तर नियोजन करियर संसदेच्या सदस्यांनी केले होते.

# अवकाळीची मदत त्वरित न मिळाल्यास शेतकऱ्यांचा महामोर्चा

## डॉ. गोपाल बच्छिरे : शिवसेना उबाठाने दिला शासनास महामोर्चाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** शेतकरी आज मरण घटका मोजत आहे निसर्ग सुद्धा त्यांची परीक्षा घेत आहे आज संपूर्ण मेहकर व लोणार तालुका हा अवकाळी ग्रस्त झालेला आहे. विनाअट हेक्टरी 50 हजाराचे नुकसान भरपाई द्या अन्यथा बळीराजाचा महामोर्चा तहसीलवर धडकेल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा संघटक प्रा.डॉ. गोपाल बच्छिरे यांनी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना दिला.

लोणार तालुक्यातील चारही मंडळ, मेहकर तालुक्यातील संपूर्ण सहा मंडळात अवकाळी अतिवृष्टीने कहर केला आहे. संपूर्ण रब्बीचे पीक जमीनदोस्त झाली त्यात हळद, तुर, कपाशी, हरबरा,गहू यांचं पूर्णतः नुकसान झालेलं आहे त्याकरिता पंचनामांमध्ये वेळ न दवडता सरसकट मेहकर लोणार तालुक्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई त्वरित मंजूर करण्यात यावे अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शासनाच्या विरोधात बळीराजाचा महामोर्चा काढण्यात येईल असा इशारा शिवसेना उभाठा जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे यांनी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना दिला.

प्रा.डॉ.गोपालसिंह बछिरे यांच्या सह तालुकाप्रमुख अॅड.दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव सर माजी सभापती कृ.उ.बा.स.विठ्ठलराव नागरे तालुका संघटक कैलास अंभोरे, तालुका उपप्रमुख



श्रीकांत नागरे, तालुका उपप्रमुख परमेश्वर दहातोंडे, संचालक कृ.उ.बा.स. विजय मोरे सर, संचालक कृ.उ.बा.स. तेजराव घायाळ, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे सर, माजी नगरसेवक शाम राऊत, ज्येष्ठ शिवसैनिक गोपाल मापारी,शहर संघटक तानाजी मापारी, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, विभाग प्रमुख राजूभाऊ बुधवंत, किसान सेना तालुकाप्रमुख सुभाष पुरी, युवा तालुकाधिकारी जीवन घायाळ, युवशहराधिकारी श्रीकांत मदनकर, अल्पसंख्यांक तालुकाप्रमुख सय्यद उमर अल्पसंख्याक शहरप्रमुख इकबाल कुरेशी, महिला तालुका संघटिका संजीवनी वाघ, गजानन चौधरी किसान आघव, राजू दहातोंडे, रमेश भानापुरे, बंडूभाऊ जोगदंड, समाधान ठाकरे स्वप्निल हाडे राजू दहातोंडे समाधान मापारी संजू राठोड, गफ्फार शाह, लालूभाई मुल्लाजी, विशाल दहातोंडे, वासिम शेख, विनोद थोरात, प्रवीण सिरसाठ सह मोठया संख्येने शेतकरी व शिवसैनिक उपस्थित होते.

## संत जगनाडे महाराज समाधी स्थळाचा विकास, सौंदर्यीकरणासाठी 66 कोटींचा निधी

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** श्री क्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर व



पालखीतळ मार्ग विकास आराखडा अंतर्गत मौजे सुदुंबरे, ता.मावळ, जिल्हा पुणे येथील श्री संत जगनाडे महाराज यांच्या समाधीचा विकास व सौंदर्यीकरण आराखड्यास मान्यता मिळाली असून यासाठी 66.118 कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी यासाठी प्रयत्न केले होते. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

श्री संत जगनाडे महाराज यांच्या समाधीचा विकास व्हावा यासाठी निधी देण्याची मागणी श्री. वडेट्टीवार यांनी मार्च 2022 मध्ये केली होती. त्यानंतर केलेल्या पाठपुराव्यामुळे सरकारने याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला असून 66.118 कोटी इतका निधी मंजूर केला आहे. श्री संत जगनाडे महाराजांच्या विचारांचा, कार्याचा प्रचार, प्रसार होण्यासाठी समाधी स्थळाचा विकास होणे महत्वाचे होते.

यासंदर्भात श्री. वडेट्टीवार म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, श्री संत जगनाडे महाराज यांचे विचार आणि साहित्य हे प्रेरणादायी आहे. संतांनी कधीही कोणत्या एका समाजासाठी काम केले नाही. संतांनी नेहमी सामाजिक बांधिलकी आणि सामाजिक एकतेचा संदेश देत सर्व समाजासाठी कार्य केले. आज समाजात घडत असलेल्या अनुचित घटना लक्षात घेता समाजाला खऱ्या अर्थाने संत विचारांची गरज आहे. संत तुकाराम महाराजांची गाथा कर्मठ लोकांनी बुडविली तेंव्हा श्री संत जगनाडे महाराजांनी तिचे संकलन आणि पुनर्लेखन केले होते. त्यांनी स्वतः अनेक अभंग लिहून समाजाला शहाणे केले. त्यांचे हे समाधी स्थळ सर्वांसाठी प्रेरणास्रोत म्हणून ओळखले जाईल. त्यांच्या समाधी स्थळाच्या विकासासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. आता या समाधी स्थळाचा दर्जेदार विकास व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

हिवराळे क्लिनिक
अॅण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
अॅक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व अॅलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# कान्होजी जेधे म्हणजे स्वराज्य उभारण्यासाठी तीन पिढ्यांचा त्याग

## प्रशांत देशमुख : संजय चिखले यांच्या कादंबरीचा प्रकाशन सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र मालुसरे**

**महाड :** अफजलखान स्वारीच्या वेळी बारा मावळातील देशमुखांना खानाची कडक फर्मान गेली होती. कान्होजी जेधेंना देखील असेच एक फर्मान गेलं होतं. ते आपल्या पाच पुत्रांना घेऊन शिवरायांच्या समोर हजर झाले. शिवरायांनी त्यांच्या निष्ठेची अनेक प्रकारे परीक्षा पाहिली. त्या परीक्षेत कान्होजी जेधे उत्तमरीत्या पास झाले. ते स्वतः तर शिवरायांच्या बाजूनं राहिलेच पण मावळातील देशमुखही राजांच्या बाजूने उभे केले. कर्नाटकच्या मोहिमेला राजे जात असताना, बाजी जेधे यांचा मुलगा नागोजी जेथे युद्धात गतप्राण झाला. शिवराय बाजींना सांगत होते की तुम्ही कारीला गावी परत जा. परंतु बाजी म्हणाले, की आज पर्यंत जेधे घराण्यातील कोणीही मोहिमेला निघालेला असताना अर्धवट मोहीम टाकून घरी परतला नाही, मी तुमच्या सोबतच येणार. हे बाजी म्हणजे कान्होजी जेधे यांचे एक सुपुत्र. तीन पिढ्यांचा त्याग प्रशांत देशमुख यांनी त्यांच्या रोमहर्षक शब्दात उभा करून साक्षात प्रसंग डोळ्यासमोर उभा केला. प्रशांत देशमुख यांनी त्यांच्या व्याख्यानात त्यांच्याकडून लिहिल्या गेलेल्या जय शिवराय या पुस्तकातील लाय पाटील आणि बाळाजी आवजी चिटणीस यांच्यावरील प्रसंग ही उभे केले. संजय चिखले यांनी लीहिलेल्या स्वराज्याचे पाईक कान्होजीराव नाईक जेधे या कादंबरीचा प्रकाशन सोहळा महाडमधील डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक बहुउद्देशीय सभागृह येथे ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर भुस्कुटे यांचे अध्यक्षतखाली व नामवंत शिवचरित्रकार प्रशांतजी देशमुख यांच्या शुभ हस्ते पार पडले यावेळी महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहलदीदी माणिकराव जगताप, अशोक तलाठी, एम एम ए प्रकाशकच्या मुग्धा मसुरकर, साहित्यिक-पत्रकार राजेंद्रप्रसाद मसुरकर, कान्होजी जेधे वंशाचे नातेवाईक अजित देशमुख, बंडूशेठ देशमुख, बंटीशेठ देशमुख, राजेंद्र कोरपे, अमित प्रभाकर मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित पार पडले, यावेळी



महाड कोमसाप, सुयोग नगर मित्रमंडळ, कोंझर ग्रामस्थ मंडळ, आनंदनगर, रशिप्र शिक्षकवृंद, मित्रपरिवार, साहित्य प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अ वि जंगम सर यांनी केले. स्नेहलदीदी जगताप,अशोक तलाठी, बंटी देशमुख, प्रभाकर भुस्कुटे तसेच लेखक संजय चिखले यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमसाप महाडचे अध्यक्ष गंगाधर साळवी तर आभार प्रदर्शन नामदेव डिगे यांनी केले.

# १४ हजारांहून अधिक हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे १४ हजारावर हेक्टर पिकांना फटका बसला आहे. पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज यंत्रणांना दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी अकोला तालुक्यातील दहिगाव, रामगाव, म्हैसांग या भागात भेट देऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, कृषी उपसंचालक विलास वाशीमकर, तालुका कृषी अधिकारी शशिकिरण जांभरूणकर आदी यावेळी उपस्थित होते. रामगाव येथे पाऊस व साचलेल्या पाण्यामुळे पिकाचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे, दहिगाव, म्हैसांग या भागातील शिवाराचीही जिल्हाधिकाऱ्यांनी पाहणी केली. वेचणी न झालेला कापूस ओला होणे, कापसाबरोबरच हरभरा, तूर पिकाचे या भागात नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. यंत्रणेने नुकसानग्रस्त क्षेत्राची संपूर्ण पाहणी करून व शेतकऱ्यांकडून त्यांच्या अडचणी जाणून घेऊन परिपूर्ण नोंदी घ्याव्यात. पंचनाम्याची कामे तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.



# श्रीनगर (काश्मीर) येथे बॉर्डरलेस वर्ल्ड फौंडेशनचा सेवा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीनगर :** भारतीय अध्यात्मिक दृष्ट्या अनन्य साधारण महत्व असलेले काश्मिर मधल्या श्रीनगर येथील निसर्ग संपन्न अश्या दल सरोवराचे महत्व वेगळे आहे.. मागील कित्येक वर्षापासून तेथील निसर्गाचा आनंद हजारो पर्यटक घेत असतात.

दल सरोवरात नौका विहार केल्याशिवाय पर्यटकांची काश्मीर सहल पूर्ण होतच नाही. अश्या सुंदर दल सरोवराची दुसरी बाजू आपल्याला कदाचित माहिती नसेल.

या सरोवराच्या अंतर्गत भागात ३५ पेक्षा जास्त गावांमध्ये सार्वजनिक वाहतुकीची गैरसोय आहे. दल सरोवरात अनेक छोट्या छोट्या वस्त्या पाण्यातच छोट्या जागेत तसेच लाकडी होडयांमधून वसल्या आहेत. त्यांचा बाह्य जगाशी संपर्क फार कमी येतो. सरोवरा मध्येच पूर्वापार चालत असलेल्या होडक्यातील तरंगत्या बाजारावर त्यांना अवलंबून राहावे लागत. त्यांचे वाहतुकीचे साधन म्हणजे होडका. त्यातूनच तेथील स्त्री/ पुरुष / मुले/ मुली एका वस्तीतून दुसऱ्या वस्तीत जा ये करत असतात. अश्या परिस्थितीत जीवन जगत असताना सातत्याने पाण्याशी संपर्क येतो त्यामुळे येथील बांधवांना त्वचेचे रोग होतात , तसेच कोणी आजारी पडल्यास वैद्यकीय मदत मिळणे अत्यंत अवघड होते.

गेली 23 वर्ष जम्मू काश्मीर मध्ये समाजकार्य करत असलेले नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथील अधिक सदाशिव कदम (अध्यक्ष, बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन) हे तेथील अनेक समस्या शोधून त्यावर मार्ग काढणेचा प्रयत्न करत आहेत.

दल सरोवराच्या या उपेक्षित जनतेची ही अडचण लक्षात घेऊन संस्थेच्या प्रमुख वैद्यकीय विभाग संचालक डॉ मनीषा पळसकर (एमबीबीएस, AIIMS DELHI) यांचे मार्गदर्शनाखाली अभ्यासगट नेमून प्रकल्प अहवाल पूर्ण करण्यात आली. या दल सरोवर काठच्या नागरिकांना त्यांचे राहते घरीच सहज वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून मोबाईल मेडिकल बोट ही संकल्पना तयार केली. त्यामध्ये बोट ऑपरेटर, डॉक्टर, लॅब टेक्निशियन, जीवरक्षक तसेच आवश्यक प्राथमिक औषधे उपलब्ध करून देण्याची योजना करण्यात आली. या सेवा कार्याला अर्थ सहाय्य . एचडीसीएफ सेक्युरिटीज या संस्थेने दिल्याने त्यांच्या या सामाजिक दायित्व योजनेतून (CSR) ही योजना राबवण्यात आली. अश्या प्रकारे बोट बनवणारी कोची, केरळ येथील माथा मरीन कंपनीने ही बोट बनवून देण्याची तयारी दर्शवली आणि वेळेत पूर्ण करून दिली त्याची तांत्रिक तपासणी महाराष्ट्रीयन उद्योजक श्री विजय देव यांनी केली त्यानंतर ती बोट श्रीनगरला दल सरोवरमध्ये आणण्यात आली.

यासाठी आवश्यक तो स्टाफ नियुक्त करून तसेच सर्व शासकीय परवानग्या घेण्यात आल्यात हे काम श्रीनगर येथील संस्थेचे विश्वस्त निघत कुरेशी, समन्वयक जया अय्यर यांनी केले. या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळ माजी खासदार श्री विनयजी सहस्त्रबुद्धे यांच्या (अध्यक्ष भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद - ICCR) प्रमुख उपस्थितीत नुकताच श्रीनगर येथे पार पडला. या प्रसंगी त्यांनी सामाजिक सेवा, शासनाची जबाबदारी याबाबत उपस्थितीतांना मार्गदर्शन केले

या प्रसंगी *सर्वश्री जूनैज मत्तू (श्रीनगरचे महापौर), सीआरपीएफचे संचालक जनरल नलीन प्रभात, धीरज रिलिज( एचडीसीएफ सेक्युरिटीज), मोहंमद आइझाज ( डेप्युटी कमिशनर श्रीनगर), मुस्ताक राथेर (संचालक आरोग्य विभाग, श्रीनगर), संस्थेचे विश्वस्त ॲड नरसिंग लगड, तसेच संस्थेचे सल्लागार प्रकाश गोरे , वलिद खालिद, तसेच अनेक प्रशासकीय अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

अशा प्रकारे बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनने एक नवीन कल्पना प्रत्यक्षात आणून एका सामाजिक कार्याचा शुभारंभ केला आहे.




# पूर्वजांच्या वतन जमिनीसाठी आमरण उपोषण

## आर.पी.आय. गटातर्फे जमीन मिळवण्यासाठी आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पूर्वजांच्या हक्काच्या मोबदला म्हणून मिळालेल्या वतन जमीन परत मिळाव्या यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर गटातर्फे विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक या ठिकाणी आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे त्या ठिकाणी उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष शशिकांत दारोळे यांनी आवाहन केले आहे की ज्या ठिकाणी कोणत्याही व्यक्तीच्या महार वतनाची जमीन जर कोणी बळकवली असेल जमिनीचा दडपशाही करून ताबा घेतला असेल त्यासाठी न्याय मिळण्यासाठी तात्काळ संपर्क साधावा किव्वा उपोषणाच्या ठिकाणी उपस्थित रहावे हे आमरण उपोषण आपल्या सर्व समाज बांधवांच्या न्याय आणि हक्कासाठी आहे असेही या ठिकाणी दारोळे यांनी सांगितले.



# हाती आलेल्या पिकाचं वाटोळ झालं..!

## पाऊस वैरी झाला : कुणी आधारवड होईल का

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** निसर्ग हा शेतकऱ्यांचा खरा "सांगाती" म्हणून ओळख आहे.. ईतके दिवस त्यानं ओंजळ भरून दान दिल.. कष्टभरल्या चेह-यावर आंनद ओसंडून वाहत होता..कुण्या मेल्याची दिष्ट लागली की..लहरी निसर्गाच्या अंगात आल्यान शेतीला शाप लागला आहे..खरीप रब्बी हंगामातील पिकाची दाणादाण झाली..अवकाळी पावसान हाताशी आलेला" घास" हिरावला गेला..अवकाळी पावसाचा जीव घेणा "डाव" आहे..सखाहरी पाऊसच आता वैरी बनल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.

#तालुक्यात कोरडवाहू क्षेत्र अधिक असल्याने बहूतांश शेतकऱ्यांची भिस्त निसर्गाच्या पाण्यावरच आहे.बागायती क्षेत्र कमी असुन त्यास वीजपुरवठा सूरळीत होत नसल्याने बिकट परिस्थितीचा सामना करावा लागतो आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी तालुक्यातील शेतीचा परिसर ओलिताखाली यावा म्हणून नव्याने मोठ्या तलावाची निर्मिती करण्यासाठी शासन दरबारी वजन खर्च करून "यश" पदरी पाडून घेतल्याने भविष्यात सिंचनाचा प्रश्न मार्गी



लागण्याची शक्यता आहे.सध्या तरी मात्र शेतक-याची फरफट सूरू आहे. मागील चार पाच वर्षांपासून निसर्गाचे संतुलन बिघडत असल्याने त्याचा फटका जनतेला सहन करावा लागतो आहे. दूसरीकडे पाणीटंचाई, वैरणाची चणचण, खरीप-रब्बी हंगामातील उत्पादन होणारी घट,महागाईचा भस्मासुर यामुळे देशाचा आर्थिक कणा म्हणून ओळख असलेल्या शेतक-याची दयनीय अवस्था झाली आहे.दिवसरात्र शेतात काबाडकष्ट करून हाती काही लागत नाही.

शेतीमालाला हमी भाव मिळत नाही.व्यापारी मात्र दिवसेंदिवस मालामाल होत असल्याचे दिसून येत आहे. बळीराजा काळ्या आईची मनोभावे सेवा करून घरिदारी लक्ष्मीची पाऊले दूडदूडत रहावी अशी आशा उराशी बाळगून मेहनत करतो आहे.निसर्गाच्या लहरी पणाचा मोठा फटका खरीप व रब्बी हंगामातील ऊत्पादनावर होतांना दिसून येत आहे.यंदा पावसाळ्याच्या पहिल्या चरणात वरूणराजाने दगाफटका दिला. मधल्या चरणात ढगफुटी झाल्याने शेतीला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले.पिकाचे अतोनात नुकसान झाले.शेवटच्या चरणातहि पाऊस गायब झाल्याने खरीप हंगाम धोक्यात आला. हिवाळा प्रारंभ होऊन दोन महिने झाले तरी "हुडहुडी " भरली नाही. रब्बी हंगाम तरी साथ देईल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे . खरिपातील कापूस,तुर भरात असताना अचानक अवकाळी वादळी पाऊस, विजेचा कडकडाट, गारपीट झाल्याने कापूस, तूर पिकाची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली आहे. सरकार मायबाप आपल्याच तो-यात वावरत आहे. बांधावर येवून आसवे पुसण्याचे काम करतात आणि तुटपूंजी मदत देवून मोकळे होतात. लादण्या भरून राहतात तरी शेवटी काही ऊरत नाही.तूटपूंज्या मदतीने वर्षभर कसे काढायचे याची चिंता शेतक-याना लागुन आहे. जगाचा पोशिंद्याला आता ईतरा समोर हात पसरण्याची वेळ आली आहे. हिरव्यागार बहरणा-या शेतीला कुणाची दिष्ट लागली माहिती नाही आजघडीला पीके मातीमोल झाल्याने शेतकरी राजा आर्थिक संकटात सापडला आहे. अशा कठीण प्रसंगी सरकार मायबाप आधारवड होवून धाऊन आला तर बर होईल हिच अपेक्षा.

# मुंबईत ४६ वे महानगर साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठी साहित्य संघ आणि नॅशनल लायब्ररी, वांद्रे आयोजित ४६ वे महानगर मराठी साहित्य संमेलन शनिवार २ डिसेंबर २०२३ रोजी नॅशनल लायब्ररी सभागृहात संपन्न होत आहे. ज्येष्ठ लेखिका वीणा गवाणकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचा प्रारंभ सकाळी ९.३० वा. ग्रंथप्रदर्शनाने होईल. उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध अभिनेते संजय मोने असून स्वागताध्यक्ष आमदार आशिष शेलार आहेत. यावेळी अमळनेर येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांचा सत्कार दोन्ही संस्थातर्फे करण्यात येईल. तसेच तीन पुरस्कारांचे वितरण होईल ते असेः विवेक कुडू यांना कथाकार शांताराम पुरस्कार (चार चपटे मासे कथा संग्रहासाठी), विनायक गोखले यांना संस्था कार्यकर्ता पुरस्कार आणि डॉ. लीला गोविलकर यांना कै.वि. स. पागे स्मृत्यर्थ अध्यात्मिक वाङ्मय पुरस्कार, १० हजार रुपये रोख, सन्मानपत्र, पुस्तक भेट व पुष्पगुच्छ असे या तिन्ही पुरस्कारांचे स्वरूप आहे. उद्घाटन समारंभानंतर प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमीत यांची मराठी शाळांच्या संदर्भात छाया पिंगे मुलाखत घेणार आहेत. “आजची समाज माध्यमंः शाप की वरदान” या विषयावर परिसंवाद ठेवला असून त्यात प्रा. अविनाश कोल्हे, सौरभ करंदीकर, आशुतोष उकिडवे आणि यश कासारे यांचा सहभाग आहे. तरुणांना व्यक्त होण्यासाठी खास १० तरुण कवींचे कवी संमेलन आयोजित केले असून त्यात प्रसिद्ध कवी सायमन मार्टिन कवींना मार्गदर्शन करतील.

# प्रेमप्रकरणातून तरुणाची हत्या झाल्याचा संशय

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** जवाहरनगर परिसरातील सालेबर्डी ( खैरी) ते कोरंभी रस्त्यावरील पंडित नाला पुलाखालील पाण्यात एका तरुणाचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. नयन मुकेश खोडपे (२३, रा. पांढराबोडी) असे मृतकाचे नाव आहे. हातपाय दोरीने बांधले असून गळ्यात दुप्पटा व मानेवर, पोटावर जखमा असल्याने तरुणाची प्रेमप्रकरणातून हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. जवाहरनगरजवळील सालेबर्डी (खैरी) येथील उपसरपंच जितेंद्र गजभिये हे मोटारसायकलने काही कामानिमित्त कोरंभी मार्गे भंडाऱ्याला जात असताना कोरंभी रस्त्यावरील पंडित नाल्यावर लघुशंकेकरीता थांबले. त्यांना पुलाखाली नाल्यातील पाण्यात एका युवकाचे प्रेत तरंगतांना दिसून आले. याची माहिती सालेबर्डी पोलीस पाटील हिरालाल पुडके व टोमदेव तितिरमारे यांच्यासह जवाहरनगर पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी स्थानिक आणि कोळी बांधवांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढला. मृताचे हात-पाय दोराने बांधल्याचे दिसून आले. गळासुद्धा आवळल्याचे तसेच मानेवर व पोटावर जखमा आढळून आल्या. सदर युवकाची हत्या करुन त्याचे हात-पाय बांधून नाल्यात फेकण्यात आले असावे, असा अंदाज वर्तविला जात आहे. पांढराबोडी येथील नयन खोडपे हा २७ नोव्हेंबर रोजी रात्री मोटारसायकल घेऊन घरुन निघून गेला होता. खोडपे कुटुंबीयांनी २८ नोव्हेंबर रोजी नयन बेपत्ता असल्याची तक्रार वरठी पोलिसांत नोंदवली होती.

# मल्हारराव नाचण डोणगावकर यांना म. जोतीबा फुले शिक्षकरत्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि. २७ व संविधान विचार मंच कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने क्रांतीबा ज्योतीबा फुले यांच्या स्मृतीदिन व संविधान दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय २०२३ हा पुरस्कार सोहळा कार्यक्रम संपन्न झाला. गेल्या २० वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, राजकीय क्षोणत मल्हारराव नाचण डोणगांवकर यांचे मुक्त पत्रकारीतेच्या माध्यमातून अनमोल असे कार्य, योगदान चालु आहे. सर्वच क्षेत्रात त्यांची वाटचाल तर आहेच प्रामुख्याने शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर आहे. प्राध्यापक असेल, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी असेल, विद्यार्थी वृंद असेल यांच्या समस्या व प्रश्न आपल्या रोखठोकपणे निर्भिडपणे, प्रामाणिकपणे, वास्तविकपणे बुलंद लेखनीतून शासन दरबारी मांडतात. त्यांच्या उल्लेखनिय, अतुलनिय, अनमोल कार्याला आणखी गती व उभारी मिळावी, प्रेरणा मिळावी व हे कार्य सदोदित चालू राहावे, प्रगतीपथाकडे जावो या उद्दात्त व दूरदर्शी हेतुने साप्ताहिक लोकहिरा व संविधान विचार मंच कोल्हापूर यांच्या वतीने मा. प्रमुख अतिथी प्रसाद कुलकर्णी (सामाजिक विचारवंत पुणे), मा. सर्जेराव गायकवाड अभिनेता दिग्दर्शक यांच्या हस्ते मा. मल्हारराव नाचण डोणगांवकर यांना राज्यस्तरीय क्रांतीबा ज्योतीबा फुले शिक्षणरत्न पुरस्कार, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह कोल्हापूरी फेटे बांधून सन्मानीत करण्यात आले.

या कार्यक्रम समयी मा. संपादक गणपती शिंदे (लोकहिरा), मा. हनुमंतराव सोनवणे (अभियंता मुंबई), मा. रमाकांत बुध्दीसागर, श्रीमती हिरा लोकरे, दिपक भोसले, रघुनाथ मांडरे, प्रसाद खोबरे, दिपक कांबळे, संजय कांबळे, सुभाष धनवडे, सुनिल चव्हाण, सतीश शिंगे, छत्रपती संभाजीनगरचे दशरथजी मानवतकर (समाजसेवक), पंडीत डोंगरे (शिक्षक), वैलास गजहंस गुरुजी आदि उपस्थित होते.

मा. मल्हाराव नाचण डोणगांवकर यांना पुरस्कार मिळाल्या बद्दल मित्र, स्नेही, नातेवाईक, पत्रकार बंधू, शिक्षक कर्मचारी, सामाजिक पदाधिकारी यांच्याकडून अभिनंदन होत आहे.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर